पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई ● वर्ष: 8 ● अंक: 15 ● 1 ऑगस्ट 2026 ● पृष्ठसंख्या: 36 ● किंमत: 5 रू.

राष्ट्रभक्तीचा हुंकार...















## युवा शक्ती

## विकसित भारताचा आधार





अध्यक्षीय मनोगत

# राष्ट्रविरोधी शक्तींच्या विरोधात एकत्र या

दिल्लीतील आंदोलन संपल्यानंतर देशापुढे भविष्यकाळात कोणती संकटे निर्माण होणार आहेत, याची जाणीव हळूहळू होऊ लागली आहे. दिल्लीतील आंदोलन विदेशातून झालेल्या अर्थपुरवठ्याच्या बळावरच आयोजित करण्यात आले होते, हे आता लपून राहिलेले नाही. या आंदोलनात सुरक्षा दलाच्या जवानांना शिवीगाळ करणे, पोलिसांवर हल्ले करणे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गलिच्छ भाषेत शिवीगाळ करणे हे सारे प्रकार पैशाच्या बळावर करून घेतले होते. देशातील तरुणाईच्या आणि सामान्य माणसांच्या मनात संविधानाने निर्माण केलेल्या संस्थांबद्दल, घटनात्मक पदांबद्दलचा आदर नष्ट व्हावा, या एकमेव हेतूने अत्यंत पद्धतशीर पद्धतीने या आंदोलनाची पटकथा लिहीली गेली होती. देशभरातले डावे या आंदोलनाच्या माध्यमातून राष्ट्रवादी विचारांच्या मोदी सरकारबद्दलची आपली मळमळ बाहेर काढण्यासाठी दिल्लीत एकत्र आले होते. देशभरातील समाजमाध्यमांवरच्या प्रभावशाली व्यक्तींना (सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर) या आंदोलनासाठी आमंत्रित करण्यात आले होते. चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध व्यक्तींनाही हा आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी विविध माध्यमातून राजी करण्यात आले. भविष्यकाळात भारतविरोधी शक्ती अशी अनेक आंदोलने घडवून आणण्याची शक्यता आहे. अशा आंदोलनांना राष्ट्रप्रेमी संघटनांनी त्याचवेळी उत्तर देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. दिल्लीत जे झाले ते पूर्णत: संविधानविरोधी होते. एकीकडे आंदोलकांच्या व्यासपीठावर संविधानातील विविध कलमांचा अर्थ उलगडून सांगितला जात होता तर दुसरीकडे आंदोलक बंदी असलेल्या संसद भवन परिसरात बळजबरीने घुसू पाहत होते. आंदोलनात घुसलेल्या गुंडांच्या टोळक्यांनी आपले कर्तव्य बजावणाऱ्या अनेक पोलिसांवर प्राणघातक हल्ले केले. पोलिसांनी आंदोलकांचा मार सहन केला, मात्र त्यांनी गोळीबार केला नाही. लाठीमार आणि अश्रूधूर या मार्गाने त्यांनी आंदोलकांना संसद भवन परिसरात जाण्यापासून रोखले. अशा या देशविरोधी आंदोलनाचे अनेक पत्रकार, विचारवंत, कलाकार निर्लज्जपणे समर्थन करत आहेत. ज्या मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन केले त्या मागण्या सरकारी मान्य केल्या, धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षणमंत्रीपदाचा राजीनामा दिला, पेपटफुटी विरोधात कडक शिक्षेची तरतूद असलेला कायदाही संसदेत मंजूर झाला आहे. मात्र सरकारच्या या निर्णयांचे एकाही विचारवंताने, पत्रकाराने, कलावंताने स्वागत केले नाही. आंदोलकांपैकी एकाही व्यक्तीने पेपरफुटी विरोधातील नव्या कायद्याविषयी भाष्य केलेले नाही. याचा अर्थ या मंडळींना सरकारनी केलेल्या कायद्याविषयी काही स्वारस्य नव्हते. चित्रपट सृष्टीतील काही प्रख्यात कलाकारांना आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी पैशाची 'लालूच' दाखवण्यात आली होती, असे एका अभिनेत्रीनेच जाहीरपणे सांगितले आहे. दिल्लीतील आंदोलन घडवून आणणारी शक्ती या पुढील काळात शांत राहणार नाही. वेगवेगळ्या कारणांचे निमित्त करून देशभर आंदोलने आयोजित केली जातील. हिंसाचार घडवून आणण्याचा प्रयत्न केला जाईल. अशा परिस्थितीत देशप्रेमी संघटनांनी या शक्तींच्या विरोधात संघटीत झाले पाहिजे. हिंसाचार करून देशात अशांतता निर्माण करू पाहणाऱ्या शक्तींना त्याच भाषेत उत्तर दिले पाहिजे. अशा आंदोलनाचा भर खोटी-नाटी माहिती पसरवण्यावर असतो. हा खोटा प्रचार हाणून पाडण्यासाठी राष्ट्रवादी विचारांच्या संघटनांनी नियोजनबद्ध प्रयत्न करून सक्रीय झाले पाहिजे. खोट्या प्रचाराचा परिणाम किती होतो, हे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत दिसले आहे. त्यामुळेच आपण आपल्या पातळीवर देशविरोधी शक्तींना चोख उत्तर देण्यासाठी सक्रीय झाले पाहिजे. रत्नागिरीत वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून मार्च काढून दिल्लीतील आंदोलनाचा निषेध करण्यात आला. असे मार्च जागोजागी निघाले पाहिजेत.

**रविंद्र चव्हाण**

# अंतरंग





संपादक : **गणेश नामदेव हाके**

सल्लागार : **माधव भांडारी**

**आ. अतुल भातखळकर**

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

संपादकीय सल्लागार

**चंद्रहास मिरासदार**

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

विभागीय समन्वयक

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे



युवा शक्ती
विकसित भारताचा आधार ०४



'जेन- झी'च्या विवेकाची 'परीक्षा' १२




नव्या भारताचे खरेखुरे Gen Z...! १५



खोटारड्यांच्या प्रचाराला जनता फसणार नाही २२




आत्मनिर्भर भारताचा नवा चेहरा २७




पुण्यातील वाहतूक कोंडी सुटणार २९




हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद नारायण कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २० येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, नरिमन पॉईंट, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपादक : गणेश नामदेव हाके, संपर्क : ०२२-२२०२२०५०

# युवा शक्ती

# विकसित भारताचा आधार

आज संपूर्ण जग भारताच्या युवा वर्गाकडे खूप मोठ्या विश्वासाने पाहत आहे. त्या विश्वासाचे कारण, हे भारताच्या युवा वर्गातील कौशल्य आणि संस्कार आहेत.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान



**।। श्रियः प्रदुग्धे विपदो रुणद्धि, यशांसि सूते मलिनं प्रमार्ष्टि।।**
**।। संस्कारशौचेन परं पुनीते, शुद्धा हि बुद्धिः किल कामधेनुः।।**

*याचा अर्थ शिक्षण हे केवळ उपजीविकेचे साधन नाही तर जीवनमान सुधारण्याचे एक समर्थ माध्यम देखील आहे. हा एक असा मौल्यवान ठेवा आहे, ज्याच्या माध्यमातून युवा शक्ती आज प्रत्येक क्षेत्रात नवनवीन विक्रम प्रस्थापित करुन देशाचे नाव उज्ज्वल करत आहे. याच दूरदृष्टीला संकल्पाचे रुप देऊन भारताच्या नवनिर्मितीच्या दिशेने वेगाने वाटचाल करणाऱ्या केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांमध्ये शिक्षणाबरोबरच कौशल्य विकास, उद्योजकता, क्रीडा, आरोग्य आणि सार्वजनिक सहभाग यांसारख्या क्षेत्रांमध्ये युवाकेंद्रित उपक्रम सुरु केले आहेत. या प्रयत्नांची फलश्रुती म्हणून ६ वर्षांपूर्वी २९ जुलै रोजी सुमारे तीन दशकानंतर आलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मुळे शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचवणे शक्य झाले, उच्च शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सेवासुविधांमध्ये वृद्धी झाली, कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींमध्ये वाढ झाली. स्टार्ट अप, डिजिटल प्लॅटफॉर्म, समावेशक दृष्टिकोन आणि सहभागाच्या माध्यमातून युवावर्ग आता अमृत पिढीच्या रुपात विकसित भारताचा संकल्प साकार करणारे सारथी बनले आहेत...*

***भारताची जनता तरुण आहे, आणि***
***भारताची मानसिकताही तरुण आहे.***
***भारत आपल्या क्षमतेत तरुण आहे,***
***आपल्या स्वप्नांमध्ये तरुण आहे.***
***भारत आपल्या विचारांमध्ये तरुण आहे,***
***आपल्या जाणिवेत तरुण आहे.***

**याच** वैशिष्ट्यांमुळे संपूर्ण जग आज भारताकडे आशा आणि विश्वासाने पाहत आहे. भारत तरुण आहे कारण भारताच्या दूरदृष्टीने नेहमीच आधुनिकता स्वीकारली आहे आणि भारताच्या तत्त्वज्ञानाने बदलाला आत्मसात केले आहे. लोकांपासून जगापर्यंतचा प्रवास असो किंवा सेवा आणि समर्पणाचा मार्ग, बदलाची दिशा असो किंवा शोर्य, सहकार्य किंवा सुधारणेचा परिचय, भारताच्या तरुणांनी स्वतःची एक नवी ओळख निर्माण केली आहे, कारण त्यांचा विश्वास 'करू शकतो' या भावनेवर आणि 'करून दाखवण्याच्या वृत्ती'वर आहे आणि आता त्यांचे ध्येय गगनभरारी घेणे हे आहे. हाच दृष्टिकोन राष्ट्राला नवनवीन संधी प्रदान करत आहे. २९ जुलै २०२० रोजी देशासमोर आलेल्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे मुख्य उद्दिष्ट भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवणे हे आहे. यासोबतच, राष्ट्रीय युवा धोरणाच्या माध्यमातून युवकांना अमृत काळाकडे नेण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. याअंतर्गत युवकांना आधुनिक कौशल्य आणि डिजिटल तंत्रज्ञानाशी जोडण्यात येत आहे तर दुसरीकडे देशात स्टार्टअप्स आणि युनिकॉर्न तयार करण्याच्या संस्कृतीला प्रोत्साहन दिले जात आहे. शिवाय, लष्करासह इतर क्षेत्रांमध्येही तरुणांसाठी नवीन संधी निर्माण होत आहेत.

रोजगार आणि स्वयंरोजगाराशी संबंधित उपक्रम प्रत्यक्षात राबवले जात आहेत. खेळाला करिअरशी जोडून समाजाची मानसिकता बदलण्यासाठी एक मोठी मोहीम सुरू आहे. अमृत पिढी म्हणून ओळखली जाणारी युवाशक्ती, भारताच्या विकास प्रवासाची प्रेरक शक्ती बनली असून ती आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्राच्या संकल्पासोबतच अमृत काळात देशाला एका नवीन उंचीवर घेऊन जाईल. जर सरकारने सुधारणावादी पावले उचलली, तर तरुणच परिणाम घडवून आणतात. सरकार आणि तरुणांमधील ही भागीदारी राष्ट्राच्या निर्धाराला नवी चालना देत आहे.

## भारत बनत आहे शिक्षणाचे जागतिक केंद्र

एखादा देश त्यातील शिक्षण आणि शैक्षणिक धोरणांमुळे जगभरात ओळखला जातो. केंद्र सरकारने जागतिक दर्जाचे शिक्षण निर्माण करून देशातील तरुणांना सक्षम केले आहे. सहा वर्षांपूर्वी पंतप्रधान मोदींनी एक नवीन, सुधारित राष्ट्रीय शिक्षण धोरण सादर केले, ज्यामुळे शिक्षण क्षेत्रात क्रांती घडली. आता इंग्रजी अनिवार्य राहिलेले नाही. केवळ शिक्षणाची उपलब्धताच नव्हे, तर दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करणे ही आता केंद्र सरकारची वचनबद्धता बनली आहे. त्यामुळे, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार प्राथमिक आणि उच्च शिक्षण या दोन्ही स्तरांवर प्रादेशिक

भाषांमध्ये अध्यापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञानासारखे तांत्रिक विषय आता पाच प्रादेशिक भाषांमध्ये शिकवले जाऊ शकतात. यामुळे केवळ प्रवेशसंख्या वाढणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टीकोनासह स्थानिक समस्यांवर प्रभावी उपाय शोधण्याची क्षमता देखील विकसित होईल.

युवाशक्तीने समृद्ध असलेल्या प्रत्येक देशात तीन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतासत आणि त्याच तरुणांची खरी ओळख घडवतात. पहिली गोष्ट म्हणजे नवकल्पना आणि अभिनव विचार. दुसरी म्हणजे धोका पत्करण्याची तयारी आणि धाडस, तिसरी म्हणजे करण्याची जिद्द कोणतेही कार्य पूर्ण करण्याचा दृढनिश्चय... परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी या तिन्ही गुणांचा संगम झाला की, अभूतपूर्व यश आणि परिणाम साध्य होतात. या गुणांच्या जडणघडणीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

हीच कारणे आहेत की जवळपास तीन दशकांच्या प्रतीक्षेनंतर २९ जुलै २०२० रोजी भारताला नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण प्राप्त झाले. हे धोरण भारताला ज्ञानाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या दिशेने पुढे नेत आहे. याचा उद्देश शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाला अधिक समग्र, लवचिक आणि २१ व्या शतकाच्या गरजांनुसार अनुकूल बनवून, भारताला एक चैतन्यशील ज्ञान समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता बनवण्यासाठी अद्वितीय क्षमता विकसित करणे हा आहे. व्यापक विचारमंथनातून तयार झालेले राष्ट्रीय शिक्षण धोरण वैज्ञानिक दृष्टिकोनावर आधारित असून विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा अनावश्यक ताण येऊ नये हे सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने तयार केले

# शिक्षणाकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन...

### दर्जेदार शिक्षणाची हमी

**गेल्या १२ वर्षांमध्ये केंद्र सरकारने शिक्षणासाठी आवश्यक पायाभूत सेवा सुविधा अधिक मजबूत केल्या असून त्यासोबत तीन दशकांच्या कालखंडानंतर राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी केली आहे. शिक्षणाचा पाया म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरणनुसार शालेय शिक्षणाचे पूर्व-प्राथमिक ते वरिष्ठ माध्यमिक स्तरापर्यंत आधुनिकीकरण करण्यात आले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० ची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने केली जात असून त्याच्या स्थापनेला ६ वर्षे पूर्ण झाली आहेत आणि आता ते ७व्या वर्षात पदार्पण करत आहे.**

# जगातील सर्वात मोठी शिक्षण प्रणाली

### उच्च शिक्षणाचे दुसरे सर्वात मोठे नेटवर्क

- २४.६९ कोटी विद्यार्थी
- १४.७१ लाख शाळा
- १.०१ कोटींहून अधिक शिक्षक
- उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची नोंदणी
  २०१४-२०१५ ला ३.४२ कोटी
  २०२५-२०२६ लाक ४.५+ कोटी
- क्यूएस क्रमवारी २०२६ च्या जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमाकांवर
- १.४९ लाखांहून अधिक शाळा आयसीटी आणि डिजिटल उपक्रमांच्या कक्षेत आणल्या.
- १.७६+ लाखांहून अधिक स्मार्ट वर्गखोल्यांना मंजुरी.
- १.७९ लाख आयसीटी प्रयोगशाळांना मंजुरी २०२५-२०२६ पर्यंत.

**आज संपूर्ण जग हे मान्य करत आहे की भारताकडे दोन अमर्याद शक्ती आहेत– एक म्हणजे लोकसंख्येचा लाभ दुसरी म्हणजे लोकशाही. ज्या देशाकडे जितकी मोठी युवा लोकसंख्या असते, त्या देशाचे सामर्थ्य तितकेच अधिक आणि त्याच्या प्रगतीच्या संधी तितक्याच व्यापक मानल्या जातात. मात्र भारताच्या तरुणांकडे केवळ लोकसंख्येचा शास्त्रीय लाभांशच नाही, तर लोकशाही मूल्येही आहेत, त्यांचा लोकशाही लाभांश अतुलनीय आहे. भारत आपल्या तरुणांना विकासाचे प्रमुख चालक म्हणून मानतो.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आहे. याच उद्देशाने, बोर्ड परीक्षांच्या पद्धतीत बदल करण्यात आले असून ग्रामीण भागांपर्यंत पोहोचण्यासाठी संशोधनाला अधिक महत्त्व देऊन ते अनिवार्य करण्यात आले आहे. एवढेच नाही तर, मनुष्यबळ विकास मंत्रालयाला आता शिक्षण मंत्रालय असेही म्हटले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विद्यार्थीस्नेही धोरणांमुळे देशात मोठे बदल घडून आले आहेत. यामुळे **एम्स, आयआयटी, आयआयएम आणि वैद्यकीय महाविद्यालयांच्या संख्येत विक्रमी वाढ झाली आहे.**

आज भारत जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण व्यवस्थांपैकी एक आहे. देशात १४.७१ लाख शाळा असून त्यामध्ये सुमारे २५ कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत आणि १ कोटीहून अधिक शिक्षक अध्यापन करत आहेत. केंद्र सरकारने तरुणांसाठी उच्च शिक्षणाशी संबंधित मूलभूत पायाभूत सुविधांचा धोरणात्मक विस्तार केला आहे. शालेय तसेच उच्च शिक्षणातील प्रवेशदरात लक्षणीय वाढ झाली आहे.

### पहिल्यांदाच सामान्य नागरिकांच्या सूचनांनुसार तयार झालेले धोरण...

स्वतंत्र भारतात १९६८ मध्ये पहिल्यांदा राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची संकल्पना मांडण्यात आली. यामध्ये शिक्षण प्रणालीत परिवर्तन घडवून आणले गेले आणि १०:२३ पद्धतीवर भर देण्यात आला. १९५२ मध्ये लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखाली माध्यमिक शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. त्यानंतर १९८६ मध्ये लागू करण्यात आलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० पर्यंत कायम राहिले. १९९२ मध्ये १९८६ च्या शैक्षणिक धोरणात काही दुरुस्त्याही करण्यात आल्या. त्यानंतर, टी.एस.आर. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आणि मग जून २०१७ मध्ये, इस्रोचे प्रमुख डॉ. के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीने मे २०१९ मध्ये 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा' सादर केला. त्याला २९ जुलै २०२० रोजी मंजुरी देण्यात आली. राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये २५ लाख ग्रामपंचायती, ६,६०० तालुके आणि ६७६ जिल्ह्यांकडून आलेल्या जवळपास २ लाख सूचनांचा समावेश आहे. सहभागी सल्लामसलत प्रक्रिया २०१५ मध्ये सुरू झाली.



शिक्षण क्षेत्रात परिवर्तन घडवण्यासाठी तयार करण्यात आलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २१ व्या शतकातील महत्त्वपूर्ण आणि परिवर्तनकारी पाऊल ठरले आहे. याचाच परिणाम म्हणून, आज भारतातील तरुण पिढी देशासमोरील प्रत्येक आव्हानाला समर्थपणे सामोरे जात आहे. त्यावर प्रभावी उपाय शोधून ते आपल्या क्षमतेचा ठसा उमटवत आहेत. महान शिक्षणतज्ज्ञ आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, शिक्षण हे प्रत्येकाच्या आवाक्यातील आणि सर्वांसाठी सहज उपलब्ध असले पाहिजे. हे शिक्षण धोरण त्यांच्या या विचारालाही समर्पित आहे. हे शिक्षण धोरण केवळ नोकरी शोधणारे नव्हे, तर नोकऱ्या निर्माण करणारे तरुण घडवण्यावर भर देते. म्हणजेच, एका अर्थाने विचारसरणी आणि दृष्टिकोनातच परिवर्तन घडवून

**भारताने झांझीबार आणि अबू धाबीमध्ये आयआयटीची दोन आंतरराष्ट्रीय संकुले सुरू केली आहेत. तर आयआयएम अहमदाबादने देखील दुबईमध्ये आपले संकुल सुरू केले आहे. १५ परदेशी विद्यापीठे भारतात आपली संकुले सुरू करतील, अशी अपेक्षा आहे.**

आणण्याचा हा प्रयत्न आहे. शिक्षणासोबतच तरुणांना विविध क्षेत्रांत विशेष संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठीही केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत सर्वसमावेशक दृष्टिकोनातून अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

### कौशल्य अभियानाच्या माध्यमातून नवा भारत कुशल बनत आहे

युवकांना त्यांच्या शिक्षण, कौशल्ये आणि आकांक्षांनुसार रोजगार उपलब्ध करून देणे याला केंद्र सरकारचे प्राधान्य राहिले आहे. देशांतर्गत रोजगार कोणत्या प्रमाणात वाढत आहे, हे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निर्देशकांमधून दिसून येते. मजबूत आर्थिक धोरणांमुळे लाखो रोजगार निर्माण होत आहेत. प्रधानमंत्री कौशल्य योजनेअंतर्गत लोकांना कुशल बनवले जात आहे. केंद्र सरकारच्या या प्रयत्नांमुळे अनेक क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. देशात स्वयंरोजगाराच्या संधीही सातत्याने वाढत आहेत, ज्यातून केंद्र सरकारचा तरुणांवरील विश्वास दिसून येतो. तरुणांना भविष्यासाठी सक्षम बनवण्यासाठी त्यांना सातत्याने कौशल्यपूर्ण करणे, पुनःकौशल्य विकसित करणे आणि त्यांच्या कौशल्यांचा विकास करणे आवश्यक आहे. याच विचाराने भारतात कौशल्य मॅपिंगचे कार्य सुरु आहे. भारतातील तरुणांकडे विविध क्षेत्रांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक कौशल्ये असणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी देशात उच्च शिक्षण संस्था, कौशल्य विकास संस्था युद्धपातळीवर उभारल्या जात आहेत. याचबरोबरीने २०१४ ते २०२६ या कालावधी दरम्यान दरवर्षी एक नवीन आयआयटी आणि एक नवीन आयआयएम उभारले गेले आहे. गेल्या १२ वर्षांमध्ये विद्यापीठे आणि महाविद्यालये सुरु होण्याची संख्या सातत्याने वाढली आहे. महाविद्यालये वाढल्यामुळे स्वाभाविकपणे प्रवेशाच्या जागांची संख्याही वाढली आहे, युवा वर्गासाठी उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या आहेत. कौशल्य विकासाच्या विविध योजनांतर्गत देशभरात ६ कोटींपेक्षा जास्त तरुण-तरुणींना कौशल्य प्रशिक्षण दिले गेले आहे.

### क्रीडा क्षेत्र बनले कारकिर्दीची नवीन ओळख

युवा वर्गाला प्रत्येक क्षेत्रात मिळत असलेल्या नवीन संधींच्या बळावर गेल्या १२ वर्षांत भारतीय क्रीडा क्षेत्राच्या एका नवीन युगाचा प्रारंभ झाला आहे. हे नवे युग भारताला केवळ एक मोठी क्रीडा शक्ती बनवण्यापुरते मर्यादित नाही, तर खेळांच्या माध्यमातून संपूर्ण समाजाला मजबूत आणि सक्षम बनवण्याची एक मोठी मोहीम आहे. एक काळ असा होता जेव्हा देशात क्रीडा क्षेत्राबाबत उदासीनतेची भावना होती. क्रीडा क्षेत्र हे देखील कारकोर्द घडवण्याचा एक पर्याय असू शकते, असा विचार फार कमी लोक करायचे. क्रीडा क्षेत्राला सरकारकडून जितकी मदत आणि सहकार्य मिळायला हवे होते, ते मिळत नव्हते हेच यामागचे कारण होते. त्यामुळेच गरीब, मध्यमवर्ग आणि ग्रामीण दुर्गम भागातील मुलांसाठी क्रीडा क्षेत्रातून स्वतःचा विकास साधणे खूप कठीण झाले होते. मुलांनी त्यांचे जीवन सुव्यवस्थित होईल अशा क्षेत्रात कारकीर्द घडवावी असेच बहुतांश पालकांनाही वाटू लागले होते. मात्र आता समाजाच्या दृष्टिकोनात मोठा बदल घडून आला आहे. जीवनात पुढे जाण्यासाठी क्रीडा क्षेत्राकडे एक पसंतीचे क्षेत्र म्हणून पाहिले जाऊ लागले आहे. **या सगळ्यात खेलो इंडिया अभियानाने मोठी भूमिका बजावली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळे देशभरातील लोकांच्या विचारांमध्ये बदल घडून आला आहे.** केंद्र सरकारनेही क्रीडा क्षेत्रात कारकीर्द घडवण्याचे मार्ग प्रशस्त करू शकणारी धोरणे आखली. **परिणामी टोकियो ऑलिम्पिकमध्ये भारताने ७ पदके जिंकून आतापर्यंतची सर्वोत्तम कामगिरी नोंदवली. पॅरिस ऑलिम्पिकमध्येही भारताने ६ पदके जिंकली. टोकियो पॅरालिम्पिकमध्येही भारताच्या खात्यात १९ पदके आली. याच प्रकारे पॅरिस पॅरालिम्पिकमध्येही भारताने २९ पदके जिंकली.** नव्या भारताचा मंत्र आहे - सज्ज व्हा आणि जिंका. पॅरालिम्पिकमध्ये भारताने जितकी पदके जिंकली तितकी पदके भारताने आजवर इतिहासात जिंकलेली नव्हती. युवा



**आज देशाचे ध्येय आहे 'विकसित भारत, सशक्त भारत'. आपल्याला विकसित भारताचे स्वप्न पूर्ण केल्याशिवाय थांबायचे नाही. मला विश्वास आहे, प्रत्येक युवा या स्वप्नाला स्वत:चे स्वप्न बनवेल. आपल्या खांद्यावर देशाची ही जबाबदारी घेईल.**

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

वर्गात विजयाबद्दलचा विश्वास निर्माण झाल्यामुळे ऑलिम्पिकमध्येही भारताने सर्वोत्कृष्ट कामगिरी नोंदवली. केंद्र सरकारच्या 'टॉप्स' या कार्यक्रमाच्या माध्यमातून खेळाडूंना सहकार्य आणि प्रत्येक स्वरुपाच्या क्रीडा प्रकारांना प्रोत्साहन दिले जात आहे. आता राष्ट्रीय क्रीडा धोरण–२०२५ भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्याच्या दिशेचा महत्त्वाचा उपक्रम ठरला आहे.

### स्टार्टअपपासून युनिकॉर्नपर्यंतची वाटचाल

गेल्या १२ वर्षांत नोकऱ्यांच्या स्वरूपातही खूप वेगाने बदल घडून आला आहे. बदलत्या परिस्थितीच्या काळात युवा वर्गासाठी नवीन क्षेत्रे उदयाला आली आहेत. केंद्र सरकार या नवीन क्षेत्रांनाही सातत्याने प्रोत्साहन देत आले आहे. या १२ वर्षांत देशाने स्टार्टअप संस्कृतीची नवीन क्रांती पाहिली आहे. २०१४ मध्ये देशात स्टार्टअप्सची संख्या केवळ शेकडोमध्ये होती, तीच संख्या आज २ लाखांच्या वर पोहोचली आहे. या स्टार्टअप्सनी किमान २१ लाख तरुण–तरुणींना रोजगार मिळवून दिला असल्याचा अंदाज आहे. या १२ वर्षांत ड्रोन क्षेत्रानेही नव्याने भरारी घेतली आहे. खतांच्या फवारणीपासून ते औषधांच्या पुरवठ्यापर्यंत ड्रोनचा वापर वाढतो आहे. गेल्या १२ वर्षांत केंद्र सरकारने मुद्रा योजनेअंतर्गत ५७ कोटींपेक्षा जास्त कर्जांचे अर्ज मंजूर केले आहेत. जवळपास १२ कोटींपेक्षा जास्त लोक असे आहेत, ज्यांनी मुद्रा योजनेच्या मदतीने पहिल्यांदाच आपला स्वतंत्र उद्योग व्यवसाय सुरू केला आहे. पीएलआय योजनेअंतर्गत केंद्र सरकार उत्पादन क्षेत्रासाठी सुमारे २ लाख कोटी रुपयांची मदत देत आहे. हा निधी भारताला जगाचे उत्पादन केंद्र बनवण्यासोबतच लाखोंच्या संख्येने युवा वर्गाला रोजगारातही मदतीचा ठरणार आहे.

### युवा वर्गातील उत्साहाला मिळत आहेत नवीन संधी

ज्या देशाचा युवा वर्ग उत्साह आणि स्फुर्तीने भारलेला असेल, त्या देशाचे प्राधान्य कायम युवा वर्ग हेच असेल. आजचा भारतही आपल्या सर्व युवा सहकाऱ्यांसाठी अशी व्यासपीठे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत आहे, जी देशाची स्वप्ने पूर्ण करण्यात उपयुक्त ठरू शकतील. भारताची डिजिटल क्रांती असो, भारताची स्टार्टअप क्रांती असो वा नवोन्मेष क्रांती असो, या सर्वांचा सर्वात मोठा लाभ युवा वर्गाला होत आहे. आज भारत ज्या प्रकारे आपल्या संरक्षण क्षेत्रात सातत्याने सुधारणा घडवून आणतो आहे, त्याचा लाभही देशाच्या युवा वर्गालाच होत आहे. एक असा काळ होता, ज्यावेळी असॉल्ट रायफल आणि बुलेट प्रुफ जॅकेट देखील परदेशातून आयात केले जायचे, मात्र आज लष्कराच्या गरजेच्या अशा शेकडो वस्तू आहेत, ज्या भारतातच बनू लागल्या आहेत. अशा सर्व अभियानांच्या माध्यमातून, भारताच्या युवा वर्गासाठी



नवीन संधी निर्माण होऊ लागल्या आहेत. अलिकडेच देशाने अंतराळ क्षेत्राचे दरवाजे युवा प्रतिभेसाठी खुले केले. परिणामी पाहता पाहता पहिल्या खाजगी उपग्रहाचेही प्रक्षेपण झाले. याच प्रकारे ॲनिमेशन आणि गेमिंग क्षेत्र, प्रतिभावान युवा वर्गासाठी व्यापक संधी घेऊन आले आहे. मनोरंजन असो, रसद पुरवठा व्यवस्थापन क्षेत्र असो, अथवा शेती असो, प्रत्येक क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. गेल्या १२ वर्षांत पोलीस आणि निमलष्करी दलात मुलींच्या संख्येत जवळपास दुप्पटीने वाढ झाली आहे. तिन्ही सैन्य दलांमध्ये आघाडीच्या पदांवर महिलांच्या नियुक्तीचा मार्ग आता खुला झाला आहे. आज महिला भारतीय नौदलात पहिल्यांदा अग्निवीरच्या रूपात, नाविक म्हणून नियुक्त झाल्या आहेत. महिलांनी सशस्त्र दलात लढाऊ भूमिकांमध्येही स्थान मिळवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारच्या वतीने सैनिक शाळांमध्ये मुलींच्या प्रवेशाला मंजुरीही दिली गेली आहे. याचाच परिणाम म्हणजे २८ मे ते १३ जून दरम्यान राष्ट्रीय संरक्षण अकादमीतून (एनडीए) प्रशिक्षित १७ महिला कॅडेट्सची पहिली तुकडी संरक्षण दलात अधिकारी म्हणून रुजु झाली आहे. ऑगस्ट २०२२ मध्ये या कॅडेट्सनी एनडीएत प्रवेश घेतला होता. हे यश देशभरातील युवा महिलांच्या भावी पिढ्यांना लष्करात कारकीर्द घडवण्यासाठी तसेच राष्ट्र उभारणीत योगदान देण्यासाठी प्रेरणा देत राहील.

आज युवा वर्गासाठी स्व प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध आहे. याउलट यापूर्वी युवावर्गाला कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याकडून आपले प्रमाणपत्र प्रमाणित करून घ्यावे लागत होते. क आणि ड गटातील पदांच्या भरतीसाठी मुलाखती बंद करण्यात आल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या या आजच्या युगात गावागावांमधील युवा वर्ग नवीन डिजिटल उद्योजक बनू लागला आहे. केंद्र सरकारच्या योजनांमुळे देशभरात रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी सातत्याने वाढत आहेत. याव्यतिरिक्त केंद्र सरकारने युवा वर्गाला १० लाख कायमस्वरूपी सरकारी नोकऱ्या देण्यासाठी रोजगार मेळ्यांचे आयोजनही सुरू केले. मात्र याची फलनिष्पत्ती पाहिली तर आतापर्यंत या मेळ्यांच्या माध्यमातून १२ लाखांपेक्षा जास्त नियुक्तीपत्रे प्रदान केली गेली आहेत. प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना यांसारखे उपक्रम आज आधारभूत उपक्रम बनले आहेत. एवढी मोठी युवा शक्ती जेव्हा राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी एकत्र येईल, त्यावेळी कोणतेही ध्येय असाध्य राहणारच नाही.

**पूर्वार्ध...**

# निवासी शाळांमुळे शिक्षण मिळवणे सोपे झाले...




■ कस्तुरबा गांधी बालिका विद्यालये (KGBVs)

■ नेताजी सुभाषचंद्र बोस निवासी शाळा (NSCBVs)

■ पीएम-जनमन धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान (DAJGUA) अंतर्गत आदिवासी समाजासाठी वसतिगृह सुविधा.

■ ४९९ एकलव्य मॉडेल निवासी शाळा.

■ १.५६ लाख विद्यार्थ्यांची नोंदणी झाली.

### तंत्रज्ञान आणि नवोन्मेष तरुणांना करत आहेत भविष्यासाठी सज्ज

■ ६ कोटींहून अधिक तरुणांना कौशल्य विकास उपक्रमांद्वारे प्रशिक्षण.

■ १.६ कोटींहून अधिक तरुणांना पंतप्रधान कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण.

■ २.१९+ कोटींहून अधिक नोंदण्या मायभारत पोर्टलवर करण्यात आल्या.

■ १ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांना अटल टिंकरिंग लॅबमध्ये प्रशिक्षण.

■ उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये १६ लाखांहून अधिक प्रकल्प विकसित करण्यात आले.

■ ६.४ कोटींहून अधिक लोकांना पीएमजी दिशाअंतर्गत प्रशिक्षण दिले आहे.

■ ६.१ कोटींहून अधिक डिजिटल स्वयं प्लॅटफार्मवर नोंदणी,१८ हजार ५८० अभ्यासक्रम आहेत उपलब्ध.

■ ३.६६ लाखांहून अधिक ई-सामग्री संसाधने दीक्षावर १३५ भाषांमध्ये उपलब्ध आहेत.

■ स्वयंप्रभा, पीएम ई-विद्या आणि दीक्षा यांनी दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल सामग्री आणि ई-संसाधनांच्या माध्यमातून शिक्षणाच्या संधी अधिक वाढवल्या आहेत.

■ ७ हजार ४०० हून अधिक संस्थांनी 'वन नेशन वन सबस्क्रिप्शन' या उपक्रमाद्वारे उच्च शिक्षण स्तरावरील शैक्षणिक आणि संसोधन संसाधनांची उपलब्धता वाढवली आहे, ज्याचा लाभार्थी वर्ग जवळपास १ कोटी आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० मुळे शिक्षणात सुधारणा

***शैक्षणिक प्रवास झाला अधिक प्रभावी आणि गुणवत्तापूर्ण***

■ १७० विद्यापीठांनी राष्ट्रीय क्रेडिट फ्रेमवर्क (NCRF) स्वीकारले आहे, ज्यामुळे विद्यार्थ्यांना क्रेडिट्स जमा करता येतात.

■ २ हजार ४६९ संस्था अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्स (एबीसी) शी संलग्न, ३२ कोटींहून अधिक विद्यार्थी ओळखपत्रे जारी करण्यात आली आहेत.

■ १५.४८ कोटींहून अधिक सत्यापित स्वयंचलित कायमस्वरूपी शैक्षणिक खाते नोंदणी म्हणजेच अपार आयडी ३१ मार्च २०२६ पर्यंत तयार करण्यात आले.

■ १५३ विद्यापीठे आता द्विवार्षिक प्रवेश आणि अनेक प्रवेश/निर्गमन संधी उपलब्ध करून देतात. वर्ष २०३५ पर्यंत उच्च शिक्षणामध्ये ५० टक्के सकल नावनोंदणी गुणोत्तराचे लक्ष्य गाठण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण पाऊल.

### परिवर्तनाचे युग...

***नोकरी शोधणाऱ्यापासून नोकरी देणाऱ्यापर्यंत***

■ २०१४ मर्यादित उद्योजकीय परिसंस्था

■ ३५० स्टार्टअप्स, ४ युनिकॉर्न

(स्टार्टअप्सना मान्यता आणि धोरणात्मक पाठिंब्याचा अभाव, मर्यादित निधी, इनक्यूबेशन आणि संधीमुळे उद्योजकतेला एक जोखमीचा व्यवसाय मानले जात होते.)

■ २०२६ भारतामध्ये जगातील तिसरी सर्वात मोठी स्टार्टअप युनिकॉर्न परिसंस्था आहे.

■ स्टार्टअप्स २.३+ लाख

■ युनिकॉर्न्स १२७

**(गेल्या १२ वर्षात २१ लाखांहून अधिक रोजगार स्टार्टअप्समध्ये निर्माण झाले आहेत.)**

# 'जेन- झी'च्या विवेकाची 'परीक्षा'

● **केशव उपाध्ये**, प्रदेश उपाध्यक्ष

> दिल्लीतील आंदोलनात २० जुलै रोजी सहभागी झालेले अनेक विद्यार्थी भाबडे असतील, पण काही 'देशविरोधी शक्ती' या आंदोलनात होत्या आणि 'वारंवार विनंती करूनही संसद परिसरात जबरदस्तीने घुसण्याचे प्रयत्न आंदोलनात घुसलेल्या समाजकंटकांनी केले. पोलिसांनी शस्त्राचा वापर करावा अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न या समाजविरोधी शक्तींचा होता...' याची कल्पना आंदोलनाच्या नेत्यांनाही नक्कीच होती.

**केंद्रीय** शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर दिल्लीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन संपले असले तरी देशातील युवा पिढीविषयी अनेक प्रश्न निर्माण करूनच आंदोलनाचा हा खेळ तात्पुरता थांबला आहे. विद्यार्थ्यांनी दिल्लीत काढलेला मोर्चा व त्यानंतर झालेल्या घटनांचे निमित्त करून दिशाभूल करणाऱ्या बातम्यांचा अक्षरशः महापूर आला होता. भावनिक असलेल्या तरुणाईचा फायदा उठवून देशात हिंसाचार पेटवण्याचे अनेकांचे मनसुबे या आंदोलनातून दिसले आहेत. त्यामुळेच या पुढील काळात देशातील तरुणाईची म्हणजे जेन झीच्या विवेकाची परीक्षा होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लक्ष्य करून सरकाररूपी व्यवस्थेला बदनाम करण्याचा विडा अनेक मंडळींनी




उचलला आहे. या खोट्या प्रचारात विद्यार्थी आणि युवक वर्गाची खरी परीक्षा आहे. ही परीक्षा आहे त्यांच्या संयमाची, संविधानावरील विश्वासाची आणि विवेकबुद्धीची.

नीट पेपर फुटीच्या घटनेचे निमित्त करत देशातील युवा वर्ग हिंसक होऊन रस्त्यावर उतरावा आणि त्यातून हिंसाचाराचा वणवा देशभर पेटावा या एकमात्र उद्देशाने युवकांची आणि विद्यार्थ्यांची माथी भडकतील, अशा पद्धतीने समाजमाध्यमांवर व्हिडीओ, रील्स, बातम्यांचा भडिमार केला जात आहे. आपण पाहात असलेला व्हिडीओ, पाहात असलेली बातमी, वाचत असलेली बातमी–लेख कितपत सत्य आहे, याची खात्री न करता विद्यार्थी आणि युवक त्यावर व्यक्त होत आहेत. देशातील आणि विदेशातील शक्तींना नेमके हेच हवे आहे. युवकांनी, विद्यार्थ्यांनी संतप्त मार्गाने आपल्या प्रतिक्रिया व्यक्त कराव्यात, यासाठी या मंडळींचा समाजमाध्यमांवर हैदोस चालू आहे. अशा वातावरणात युवकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपली डोकी शांत ठेवत आपल्यासमोर येणाऱ्या माहितीची शहानिशा केली पाहिजे. समाजमाध्यमातून आपल्यापर्यंत पोहोचवली जाणारी प्रत्येक बातमी खरी नसते, अनेकदा ती खोटी बनवून पाठवली जाते, याची अनेक विद्यार्थी, युवकांना कल्पनाही नसते.




दिल्लीत पोलिसांच्या वाहनांची अशी तोडफोड करण्यात आली.

### एकावरही कारवाई नाही

आता वळू या... दिल्लीत विद्यार्थ्यांनी काढलेल्या मोर्चात नेमके काय घडले याकडे. अनेक दिवस विद्यार्थ्यांचे जंतर–मंतरवर आंदोलन सुरू असताना पोलिसांनी अथवा कोणत्याही सरकारी यंत्रणेने एकाही आंदोलकावर कारवाई केलेली नाही. संसदेचे अधिवेशन चालू असताना आंदोलकांनी संसदेवर मोर्चा काढण्याचा निर्णय जाहीर केला. संसद परिसरात संविधानाद्वारे तयार करण्यात आलेल्या कायद्याने सुरक्षेचे अनेक नियम तयार केले आहेत. हे नियम लक्षात घेऊनच पोलिसांना कायद्याच्या रक्षणासाठी काही निर्णय परिस्थिती बघून घ्यावे लागतात.

आंदोलकांचा मोर्चा जसजसा पुढे सरकू लागला तसे पोलिसांना लक्ष्य करत त्यांच्यावर जमावाने हल्ले चढवण्याचे प्रकार सुरू झाले. संसद परिसरात प्रवेश करण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टिकोनातून कडक नियम बनवण्यात आले आहेत. संसद हा आपल्या देशाचा मानबिंदू आहे. संविधानाने लोकशाहीचे जे चार स्तंभ निर्माण केले आहेत त्यात संसद हा प्रमुख स्तंभ आहे. पोलीस यंत्रणेने वारंवार विनंती करूनही संसद परिसरात जबरदस्तीने घुसण्याचे प्रयत्न आंदोलनात घुसलेल्या समाजकंटकांनी केले. पोलिसांनी शस्त्राचा वापर करावा अशी परिस्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न या समाजविरोधी शक्तींचा होता.

### पोलिसांवर जमावाचे हल्ले

या आंदोलनात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थी आणि युवकाला मोर्चामध्ये नेमके काय चालले आहे, पोलिसांवर जमावाने हल्ले केले जात आहेत (मॉब लिंचिंग) केले जात आहे, याची कल्पना नव्हती. 'नीट' परीक्षा व्यवस्था निर्दोष व्हावी या प्रामाणिक हेतूने अनेक विद्यार्थी, युवक या आंदोलनात सहभागी झाले होते. असे अनेक विद्यार्थी, युवक जे कोणताही राजकीय हेतू नसताना या आंदोलनात सहभागी झाले होते, त्यांना मोर्चामध्ये गोंधळ घडवून आणला जात आहे, याची माहितीही नव्हती. पोलीस, पोलिसांची वाहने यांच्यावर दगडफेक करणारी मंडळी कोण आहेत, त्यांचे हेतू काय आहेत हेही अनेक विद्यार्थी, युवकांना ठाऊक नव्हते.

या आंदोलनात प्रामाणिक हेतूने सहभागी झालेल्या युवकांना संसद परिसरातील सुरक्षा व्यवस्थेची माहिती असणे शक्यच नाही. संसद परिसरातील बाहेरच्या रस्त्यांवर दिल्ली पोलीस सुरक्षा सांभाळतात. संसदेकडे बळजबरीने जाऊ पाहणाऱ्या व्यक्ती, जमाव, झुंडीवर कायद्याने ठरवून दिलेल्या मार्गाने म्हणजे लाठी, ढाल, पाण्याचे बंब, अश्रुधुराच्या नळकांड्या यांचा वापर करून संसदेचे रक्षण करण्याची जबाबदारी दिल्ली पोलीस पहिल्या सुरक्षा कवचामध्ये करतात. संसदेच्या अंतर्गत परिसरातील सुरक्षा



व्यवस्थेची जबाबदारी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाकडे आहे. संसद परिसरात बळजबरीने, बेकायदा मार्गाने घुसखोरी करणाऱ्या व्यक्ती अथवा जमावावर गोळ्या घालण्याचे अधिकार या सुरक्षा यंत्रणेला कायद्याने देण्यात आले आहेत. २० जुलै रोजी पोलिसांवर हल्ले करत सुटलेला जमाव पोलिसांना झुगारून संसदेच्या अंतर्गत भागात पोहचला असता तर केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाला नाईलाजाने गोळीबार करावा लागला असता. सुरक्षा यंत्रणेने गोळीबार केला नसता तर बांगलादेश आणि नेपाळप्रमाणे आपल्या संसदेची इमारत नष्ट झाली असती.



### नेत्यांना कल्पना नव्हती ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान हातात घेऊन आंदोलन करणाऱ्या युवा नेत्यांना जमाव संसदेत घुसू पाहतो आहे आणि कायदा हातात घेत आहे याची कल्पना नव्हती, असे म्हणणे मूर्खपणाचे आहे. आंदोलनात घुसलेल्या अनेक मंडळींना सुरक्षा यंत्रणेकडून गोळीबार केला जावा आणि त्यात आंदोलकांचा बळी जावा, असेच वाटत असावे. जमावाचे, झुंडीचे विशिष्ट मानसशास्त्र असते. या मानसशास्त्राचा वापर करून पोलिसांना एक-एकटे गाठून त्यांच्यावर हल्ले चढवले गेले. पोलिसांच्या वाहनांची, सरकारी वाहनांची जबरदस्त तोडफोड करण्यात आली. पोलिसांनी अशावेळी अत्यंत संयमाने गोळीबारासारखी परिस्थिती येऊ न देता परिस्थिती हाताळली. अनेक भाबड्या युवकांना आपण सरकार, व्यवस्थेविरोधात आंदोलन करत आहोत, याचा वेगळाच अभिमान असतो. या अभिमानाच्या धुंदीमध्ये विवेकबुद्धी हरवून बसते आणि जमाव हिंसक बनतो. पोलिसांनी लाठीमार का केला यामागची खरी कारणे जाणून न घेता अनेक विद्यार्थी, युवक, कलाकार मोदी सरकारविरोधात टीकेचा राग आळवत आहेत. बेभान झालेल्या जमावाला आवरण्यासाठी पोलिसांना, सुरक्षा दलाला गोळीबार करावा लागला असता तर त्याचे खापर पोलिसांवर, सरकारवर फोडायला ही मंडळी मोकळी असतात.

### बळी गेला असता तर ?

काही अघटित घडले असते तर अशा समाजविरोधी शक्तींचाच विजय झाला असता. त्यात बळी मात्र निष्पाप विद्यार्थी, युवकांचा गेला असता. त्याची जबाबदारी घेण्यास आंदोलकांपैकी, त्यांना पाठिंबा देणाऱ्या केजरीवाल, योगेंद्र यादव यापैकी एकही जण पुढे आला नसता. शाहीनबाग आंदोलनात याच पद्धतीने जमावाला भडकवले गेले होते. त्याचा परिणाम त्या आंदोलनानंतर झालेल्या दंगलीवेळी दिसला. पोलिसांच्या लाठीमाराचे अनेक बनावट व्हिडीओ फिरवून विद्यार्थ्यांची, तरुणांची माथी भडकवण्याचा पद्धतशीर प्रयत्न सुरू आहे. प्रामाणिक आंदोलकांना पुढे करून त्यांच्या मागून पोलिसांवर अनेक हल्ले झाले. समाजमाध्यमांवर पोपटपंची करणाऱ्या अनेक मराठी कलाकारांना पोलिसांवर झालेल्या हल्ल्याची माहिती घेण्याची गरजही वाटली नाही. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या म्हणीप्रमाणे अनेक मंडळींकडून आपल्या पूर्वग्रहदूषित भूमिकांचे प्रदर्शन घडवले गेले. दिल्लीतील आंदोलन संपले असले तरी या पुढील काळातही अशाच पद्धतीने तरुणाईची माथी भडकवण्याचे प्रयत्न होतील. या प्रचारामागील खरा हेतू जाणून घेऊन तरुणाईने देशविरोधी शक्तींच्या हातातील बाहुले बनू नये,एवढीच अपेक्षा आहे. ■

# नव्या भारताचे खरेखुरे Gen Z...!



**देश** बदलायचा असेल तर केवळ टीका करून नाही, तर कर्तृत्वाने इतिहास घडवावा लागतो. आजचा नवा भारत अशाच तरुणांच्या बळावर जगासमोर उभा राहत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या समवेत उभे असलेले हे तरुण म्हणजे Skyroot erospace चे सहसंस्थापक पवन कुमार चंदाना आणि नागा भरत डाका. माजी इस्रो शास्त्रज्ञ असलेल्या या दोघांनी आपल्या सहकाऱ्यांसह भारतातील पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेट 'विक्रम-१' यशस्वीपणे अंतराळात झेपावून इतिहास रचला आहे. या यशामुळे भारताच्या अंतराळ क्षेत्रात खासगी उद्योगांसाठी नवे दालन खुले झाले आहे. हेच आहेत नव्या भारताचे खरेखुरे Gen Z जे सोशल मीडियावर वाद घालण्यात वेळ घालवत नाहीत, तर संशोधन, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या जोरावर भारताचा तिरंगा जगभर अभिमानाने फडकवत आहेत. देशाला आज अशाच तरुणांची गरज आहे. या खेरीज संशोधन क्षेत्रात नाव कमावणाऱ्या युवा संशोधकांचा परिचय देत आहोत...

**डॉ. सत्येंद्र के. मांगरुथिया :** हैदराबादच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ राइस रिसर्च'चे वरिष्ठ शास्त्रज्ञ. त्यांनी भारताची पहिली अनुवांशिकरीत्या संपादित भाताची जात 'डीडीआर धान १०० (कमला)' विकसित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**डॉ. दीपा आगाशे :** बेंगळुरू येथील 'नॅशनल सेंटर फॉर बायोलॉजिकल सायन्सेस'मधील उत्क्रांतीवादी जीवशास्त्रज्ञ

**डॉ. जगदीश जी. कपुगंती:** दिल्लीतील 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लांट जीनोम रिसर्च'चे वनस्पतीशास्त्रज्ञ.

**डॉ. देबार्क सेनगुप्ता :** जैविक विज्ञानातील प्रगत कॉम्प्युटेशनल मॉडेल्सवर संशोधन करणारे प्रमुख संशोधक.

**प्रा. श्वेता अग्रवाल :** आयआयटी मद्रास किंवा प्रमुख संस्थांमध्ये कार्यरत. त्यांनी क्वांटम कॉम्प्युटर्समध्ये डेटा सुरक्षित ठेवण्यासाठी लागणाऱ्या प्रगत क्रिप्टोग्राफीवर महत्त्वाचे संशोधन केले आहे.

**प्रा. सब्यसाची मुखर्जी :** गणितीय मॉडेल्स आणि विश्लेषण क्षेत्रातील युवा शास्त्रज्ञ.

**प्रा. महेश काकडे :** आयआयएससी बेंगळुरूमधील प्रसिद्ध गणितज्ज्ञ, ज्यांना उत्कृष्ट गणितीय संशोधनासाठी प्रतिष्ठित 'इन्फोसिस पुरस्कार' देखील मिळाला आहे.

**प्रा. सुहृद एस. मोरे :** खगोलभौतिकशास्त्र क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे युवा संशोधक.

**अंकुर गर्ग :** अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नाविन्यपूर्ण संशोधनासाठी ओळखले जाणारे युवा शास्त्रज्ञ.



**प्रा. अमित कुमार अग्रवाल :** क्वांटम फिजिक्स आणि मटेरिअल सायन्सचे संशोधक.

**डॉ. दिब्येंदू दास :** रसायनशास्त्रातील नवनवीन रासायनिक प्रक्रिया आणि नॅनो-मटेरिअल्सवर संशोधन.

**प्रा. अर्कप्रभा बसू :** संगणक अभियांत्रिकी आणि अत्याधुनिक हार्डवेअर आर्किटेक्चर क्षेत्रातील युवा प्राध्यापक व संशोधक.

**डॉ. वलीउर रहमान :** पृथ्वी विज्ञान क्षेत्रातील महत्त्वाचे हवामान बदलांचे संशोधक.

**डॉ. सुरेश कुमार :** वैद्यकीय क्षेत्रातील प्रगत रोगांवर नवीन औषध प्रणाली शोधणारे संशोधक.

**प्रा. मोहनशंकर शिवप्रकाशम :** मेडिकल टेक्नॉलॉजी आणि इनोव्हेशन क्षेत्रात डिजिटल हेल्थकेअर उपकरणांची निर्मिती करणारे तंत्रज्ञ. ■

# माझा नरेंद्र मोदींना पाठिंबा- भरत दाभोळकर

**मी पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांना पाठिंबा देतो आणि पुढेही देत राहीन. राहुल बाबा किंवा इतर घराणेशाहीच्या राजकारण्यांचे अंधभक्त होण्यापेक्षा मोदींचा तथाकथित अंधभक्त म्हणून ओळखले जाणे मला अधिक मान्य आहे.

माझ्या मते नरेंद्र मोदी हे भारताला लाभलेले सर्वोत्तम पंतप्रधान आहेत. देशातील जनतेने त्यांना लोकशाही मार्गाने सलग तीन वेळा निवडून दिले आहे. याचा अर्थ असा की भारतातील बहुसंख्य नागरिक त्यांच्यावर विश्वास ठेवतात. अर्थात, लोकशाहीवर खरोखर विश्वास असेल तर निकाल आपल्या पक्षाच्या विरोधात गेला तरी तो स्वीकारला पाहिजे.

नीट (NEET) प्रश्नपत्रिका गळती प्रकरणात शिक्षणमंत्र्यांनी अत्यंत जलद, कार्यक्षम आणि यशस्वी पद्धतीने परिस्थिती हाताळली. त्यामुळे त्यांनी राजीनामा दिला याचे मला दुःख वाटते. जर काही अशिक्षित, अर्धशिक्षित किंवा कमी शिक्षित चित्रपट कलाकार, काही प्रादेशिक राजकारणी व त्यांची मुले, तसेच स्वतःला जनरेशन झेडचे विद्यार्थी म्हणवून घेणाऱ्या काही समाजविघातक घटकांच्या दबावामुळे त्यांना राजीनामा द्यावा लागला असेल, तर ते अत्यंत दुर्दैवी आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आणि त्यांच्या पालकांबद्दल मला मनापासून सहानुभूती आहे. मात्र, फक्त दहा दिवस परीक्षा पुढे ढकलली गेली आणि त्यामुळे एका वर्षाचेही नुकसान झाले नाही, अशा परिस्थितीत इतके टोकाचे पाऊल उचलले गेले, याबद्दल मला प्रश्न पडतो. आयुष्यात येणाऱ्या आव्हानांना सामोरे जाण्याची मानसिक तयारी त्यांना योग्य प्रकारे मिळाली होती का, याचाही विचार व्हायला हवा.

खरे आणि प्रामाणिक नीट विद्यार्थी या आंदोलनाचा भाग झाले नाहीत. सुमारे २० लाख विद्यार्थ्यांनी पुनर्परीक्षा दिली आणि यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. मुलींमध्ये एका मराठी विद्यार्थिनीने सर्वोच्च गुण मिळवले, याचा मला अभिमान आहे. तसेच एका विद्यार्थ्याने अव्वल स्थान



मिळवले. **हीच आपल्या देशाची खरी 'जनरेशन झेड' आहे** आणि त्यांचा मला अभिमान आहे. दुसरीकडे, मी काही आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांचे व्हिडिओ पाहिले. एका तरुणीने, इतर मुलींसमोर उभे राहून, पंतप्रधानांविषयी अत्यंत अश्लील आणि अपमानास्पद भाषा वापरली. त्याचप्रमाणे एका तरुणानेही पंतप्रधानांविषयी अश्लील व अवमानकारक वक्तव्य केले. अशा प्रकारची भाषा आणि वर्तन कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही.

जर हीच त्यांना मिळालेली संस्कारांची शिकवण असेल, तर अशा वर्तनावर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. मला अशा लोकांचे समर्थन मान्य नाही. मी त्या तरुणांचे समर्थन करतो जे परिश्रम, शिस्त आणि गुणवत्तेच्या बळावर पुढे जात आहेत, अशा असभ्य वर्तन करणाऱ्यांचे नाही.

मला पूज्य बाळासाहेब ठाकरे यांचे ते शब्द आजही आठवतात, जे मी स्वतः त्यांच्या तोंडून ऐकले होते. त्यांनी म्हटले होते, या देशाला प्रगती करायची असेल, तर देशाला एका कणखर नेतृत्वाची गरज आहे. ज्या पद्धतीने मी माझा पक्ष चालवतो, त्याच पद्धतीने देश चालवला गेला पाहिजे. त्या विचारांबद्दल माझा आदर आहे.

आणि हो, मी नरेंद्र मोदी यांना मनापासून आणि संपूर्णपणे पाठिंबा देतो.

**– भरत दाभोळकर**

# युवकांनो आपल्या देशात काय-काय घडते आहे हे माहिती आहे का?

**सोनम वांगचुक यांचे उपोषण, सीजेपीची आंदोलने होत असताना युवा पिढीचा सहभाग असलेल्या अभिमानास्पद आणि अनेक सकारात्मक घटना देशात घडल्या आहेत. त्याचा थोडक्यात आढावा...**



■ **१० जून:** भारताचे संरक्षण उत्पादन २०२५-२६ मध्ये १.७८ लाख कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचले.

■ **११ जून:** 'मेक इन इंडिया' अंतर्गत भारतात तयार झालेल्या पहिल्या सी-२९५ लष्करी वाहतूक विमानाने पहिले उड्डाण घेतले. अशी ४० विमाने निर्मितीच्या प्रक्रियेत आहेत.

■ **१०-११ जून:** डीआरडीओने बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण (बीएमडी) आणि जहाजविरोधी क्षेपणास्त्रांच्या दुसऱ्या टप्प्याची यशस्वी चाचणी घेतली.

■ **१३ जून:** एनडीएमध्ये प्रशिक्षित महिला कॅडेट्सच्या पहिल्या तुकडीला भारतीय सशस्त्र दलात कमिशन देण्यात आले. महिला सक्षमीकरणासाठी ही एक ऐतिहासिक सुरुवात आहे.

■ **१५ जून:** ओडिशा येथून स्वदेशी बनावटीच्या लांब पल्ल्याच्या जमिनीवर मारा करणाऱ्या क्रूझ मिसाईलची (LRLACM) यशस्वी चाचणी घेण्यात आली.

■ **२१ जून:** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोलकाता येथे आयएनएस दुनागिरी, आयएनएस संशोधन आणि आयएनएस अग्रय या तीन स्वदेशी युद्धनौका भारतीय नौदलाला समर्पित केल्या.

■ **२४ जून:** आरडीएसओ (RDSO) आणि एआरएआय (ARAI) यांनी एलएचएम (LHM) ट्रेनच्या डब्याची संपूर्ण क्रॅश चाचणी यशस्वीपणे पार पाडली, ज्यामुळे रेल्वे प्रवाशांची सुरक्षा अधिक मजबूत झाली.

■ **२४ जून:** इस्रोने (ISRO) १७५-टन थ्रस्टच्या सेमी-क्रायोजेनिक इंजिनच्या पॉवर हेडची यशस्वी चाचणी घेतली.

■ **२६ जून:** कल्पक्कम येथे फास्ट ब्रीडर रिॲक्टरच्या उष्णतेचा वापर करून अणुऊर्जेवर चालणाऱ्या हायड्रोजन उत्पादन प्रकल्पाचे कार्यान्वयन करण्यात आले.

■ **११ जुलै:** संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी विशाखापट्टणम येथे आयएनएस महेंद्रगिरी भारतीय नौदलाला समर्पित केली.

■ **१२ जुलै:** भारतीय युवा संघाने ५६ व्या आंतरराष्ट्रीय भौतिकशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये (IPhO २०२६) पाच सुवर्णपदके जिंकून जगात प्रथम स्थान पटकावले.

■ **१३ जुलै:** भारताचा पहिला अडथळामुक्त द्रुतगती मार्ग, लखनौ-कानपूर द्रुतगती मार्ग लोकांसाठी खुला.

■ **१७ जुलै:** पंतप्रधान मोदींनी हरियाणातील जिंद येथे भारताच्या पहिल्या स्वदेशी आणि जगातील सर्वात लांब १० डब्यांच्या हायड्रोजन ट्रेनला हिरवा झेंडा दाखवला.

■ **१८ जुलै:** स्कायरूट एरोस्पेसच्या तरुण भारतीय अभियंत्यांनी विक्रम-१ यशस्वीरित्या प्रक्षेपित केले. खाजगी क्षेत्राने विकसित केलेले हे पहिले रॉकेट आहे, ज्याने आपला पेलोड पृथ्वीच्या निम्न कक्षेत (Low Earth Orbit) यशस्वीरित्या स्थापित केला.

■ **१९ जुलै:** भारतीय जेन-झेड (Gen-Z) संघाने आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाडमध्ये चार सुवर्णपदके जिंकून जगात प्रथम स्थान पटकावले.

वरील सर्व उपलब्धींमध्ये भारताच्या जनरेशन-झेडने (Gen-Z) सर्वाधिक योगदान दिले आहे. भारताची जनरेशन-झेड देशाच्या प्रगतीत हातभार लावत आहे. आणि जनरेशन-झेडच्या नावाखाली अराजकता पसरवणारे जंतर-मंतरवर आंदोलन करत होते. ■

# देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त




नागपूर– उपस्थिती– प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महानगराध्यक्ष दयाशंकर तिवारी, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी आदी.



प्रदेश कार्यालयात आदिवासी विकास मंत्री प्रा.अशोक उईके यांनी रक्तदान केले.



सोलापूर– उपस्थिती– विक्रम देशमुख, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, तालुकाध्यक्ष काकासाहेब सरडे, नगरसेवक रामभाऊ ढाणे, शहराध्यक्ष जगदीश अग्रवाल, भगवानगिरी गोसावी, संजय घोरपडे, नितीन झिंजाडे, आजिनाथ सुरवसे, अमोल पवार, अशोक ढेरे, दिनेश मडके, राजश्री खाडे, संगीता नष्टे, हनुमंत रणदिवे, सोमनाथ घाडगे आदी.



लातूर– उपस्थिती– जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, नगरपरिषदेचे गटनेते मनोज पुदाले, जिल्हा सरचिटणीस अमोल निडवदे आदी.




सटाणा (जि.नाशिक)– उपस्थिती– आ.दिलीप बोरसे, जिल्हाध्यक्ष निलेश कचवे, डॉ. तुषार शेवाळे, नितीन सोनवणे, वसी अहमद, पुष्पलता पाटील, अनिल पाकळे, सुभाष आहिरे, शरद भामरे, प्रवीण पवार, देवा पाटील, नलिनी पाटील, रझिया शाह, अब्दुल अजीज, सुरेखा भुसे, अब्दूर रहेमान, रिझवान फरमान, डॉ. राजेंद्र ठाकरे आदी.

# राज्यभर रक्तदान शिबिरांचे आयोजन



सांगली- उपस्थिती- आ. सुधीर गाडगीळ , जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, माजी आ. दिनकर पाटील, राज्य परिषद सदस्य प्रकाश बिरजे, जिल्हा प्रभारी शेखर इनामदार, मनपा सभापती अतुल माने, नगरसेवक विश्वजित पाटील, उदय बेलवलकर, संतोष पाटील, केदार खाडिलकर, सुरेश बंडगर, युवराज गायकवाड, दीपक वायदंडे, नगरसेविका अनिता पवार, मनीषा कुकडे, माजी नगरसेविका उर्मिला बेलवलकर, सविता मदने, जिल्हा सरचिटणीस विशाल पवार, स्मिता भाटकर, जिल्हा उपाध्यक्ष संदीप कुकडे, शरद देशमुख आदी.

मुंबई- उपस्थिती- अल्पसंख्यांक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी, प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी आदी.







अमरावती- उपस्थिती- आ. प्रविण पोटे-पाटील, जयंत डेहनकर, शिवराय कुलकर्णी, चेतन पवार आदी.




कुसुंबा (जि. धुळे)- उपस्थिती- रितेश परदेशी, संग्राम पाटील, नारायण शिंदे, डॉ. लेखराज शिंदे, अमोल शिंदे, हरीश शेलार, जी. जी. पाटील, राहुल पाटील, निखिल ठाकरे, सुनिल शिंदे, भटू चौधरी, छोटू शिंदे, रोहित परदेशी, कुणाल शिंदे, रोहित जैन, पुष्पक परदेशी आदी.

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी




सोलापूर– उपस्थिती– आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल, रामचंद्र जन्नू, सुरेश चिक्कळळी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, नगरसेवक अक्षय अंजीखाने, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, सिद्धेश्वर कमटम, नगरसेविका सुनीता कामाठी, सारिका खजूरगी, अप्पू कडगंची, अजय पोन्नम, युवराज सरवदे, अविनाश महागावकर, महिला बालकल्याण समिती सभापती निर्मला जंगम आदी.



मुंबई– दिव्यांगांना व्हीलचेअर वाटप– उपस्थिती– शुभ्रांभ दीक्षित, ममता दीक्षित, सुबेदार यादव, नितीन कांबळे, प्रिता कदम, रामजीत यादव, सुधीर सिंह, मनोज गुप्ता आदी.



गिरगाव (मुंबई)– स्तन कर्करोग तपासणी शिबीर– उपस्थिती– ज्येष्ठ नेते अतुल शाह, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्षा शलाका साळवी, मंडल अध्यक्षा दिपाली मालुसरे, वॉर्ड अध्यक्ष सुशील राणे, वॉर्ड अध्यक्ष गौरव पाटील, महिला मोर्चा अध्यक्ष अल्पना तिवरकर आदी.



नागपूर– विद्यार्थ्यांना सायकल वाटप– उपस्थिती–प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, आ. प्रविण दटके, नागपूर महानगर अध्यक्ष दयाशंकर तिवारी, सौ. अश्विनी जिचकार, विष्णु चांगदे, नंदा जिचकार, दिलीप दवे, महेंद्र भुगांवकर, ईश्वर ढेंगळे, विनोद शिंदे आदी.



पुणे– रक्तदान शिबीर– उपस्थिती– शहराध्यक्ष धीरज घाटे, आ. सुनील कांबळे, सरचिटणीस सुशील मेंगडे आदी.



चिपळूण– रक्तदान शिबीर– उपस्थिती– आ. प्रमोद जठार, रत्नागिरी जिल्हा उपाध्यक्ष बळीराम मोरे, सरचिटणीस स्वानंद रानडे, सुप्रिया उत्तेकर, अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष लियाकत शहा, उपनगराध्यक्षा रुपाली दांडेकर, जिल्हा चिटणीस योगेश शिर्के, शहर मंडल अध्यक्ष शशिकांत मोदी, अध्यक्ष आदिती गुडेकर, सारिका भावे, शुभम पिसे, नगरसेवक संदीप भिसे, नगरसेविका अंजली कदम आदी.

# खोटारड्यांच्या प्रचाराला जनता फसणार नाही

> दिल्लीत झालेल्या विद्यार्थी आंदोलनानंतर आणि आंदोलन चालू असतानाही युवक, विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण व्हावा, सरकारविरोधात असंतोष तयार व्हावा अशा हेतूने खोट्या बातम्या पसरवण्याचे उद्योग जोमाने चालू झाले होते. दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देणाऱ्या डाव्या पक्षाच्या समर्थकांनी समाजमाध्यमांवर खोट्या बातम्यांचा कारखानाच सुरू केला होता.



पोलिसांनी लाठीमार केल्याच्या खोट्या बातम्या पसरवणाऱ्या लोकांनी जखमी पोलिसांकडे दुर्लक्ष केले.

**आंदोलनामध्ये** पोलीस लाठीमारात एक विद्यार्थिनी मरण पावल्याची बातमी पसरवण्यात आली. त्या बातमीत विद्यार्थिनीचे म्हणून जे छायाचित्र वापरण्यात आले होते ते एका दाक्षिणात्य अभिनेत्रीचे असल्याचे चौकशीत उघड झाले. आपल्या बरोबर आंदोलन करणारी एका विद्यार्थिनी पोलिसांच्या लाठीमारात स्वर्गवासी झाली ही बातमी वाचून आंदोलक अधिक संतप्त व्हावेत, आंदोलकांनी संतापाने पोलीस यंत्रणेवर हल्ले चढवावेत, असा हेतू ही बातमी पसरवण्यामागे होता. मात्र या खोट्या बातमीचे बिंग लगेच फुटल्याने त्याविषयीची चर्चा आंदोलक समर्थकांनी बंद केली. २० जुलै रोजी पोलीस आंदोलकांवर लाठीमार करत असल्याची निवडक छायाचित्रे काढून ती मॉर्फ करून प्रसिद्धीला देण्यात आली. ज्या आंदोलकांनी पोलिसांवर संघटीत पद्धतीने हल्ले चढवले, आक्रमक पद्धतीने संसद परिसरात लावलेले बॅरीकेड ओलांडून जाण्याचा प्रयत्न केला अशाच दंगेखोरांवर पोलिसांनी लाठीमार केला. आंदोलकांनी केलेल्या हल्ल्यात सुमारे १२० पोलीस कर्मचारी जखमी झाल्याचे दिल्ली पोलिसांकडून सांगण्यात आले. पोलिसांवर नियोजित पद्धतीने हल्ले चढवणाऱ्या टोळक्यांकडे पोलिसांनी निमूटपणे पाहत बसावे अशी काही जणांची इच्छा होती. संसद भवन परिसरातील केंद्रीय सुरक्षा दलाचे कर्मचारी आणि दिल्ली पोलिसांनी दंगेखोरांच्या मोठ्या जमावाला अडवले नसते तर मोठा अनर्थ झाला असता. काही आंदोलक संसद भवन परिसरात घुसले असल्याची खोटी बातमीही पद्धतशीरपणे पसरवण्यात आली. दंगेखोरांच्या जमावाची हिंमत वाढावी आणि त्यांनी संसद परिसरातील सुरक्षेचे अडथळे मोडून काढावेत, या एकमात्र हेतूने ही बातमी पेरली गेली. विशेष म्हणजे या बातमीची शहानिशा न करताच एका दूरचित्रवाणी वाहिनीने ही खोटी बातमी प्रसारीत केली. आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या कारवाईला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाली होती. या याचिकेची तातडीने सुनावणी करण्यासाठी आणि पोलिसांच्या कथित लाठीमाराचे व्हिडिओ पाहण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही, असे सरन्यायाधीश म्हणाल्याची बातमीही वेगाने पसरवली गेली. संविधानाने निर्माण केलेल्या न्याय व्यवस्थेविषयी




| Merit No | Application ID | Candidate's Full Name |
|---|---|---|
| 32 | EN26350064 | KHOSE DHRUV DHARMARAJ |
| 33 | EN26148265 | SUJAL SANTOSH JADHAV |
| 34 | EN26197881 | KANISHK DEVENDRA WAGH |
| 35 | EN26150138 | JADHAV ANANT ASHOK |
| 36 | EN26282418 | SWAPNIL ASHOK WADHEKAR |
| 37 | EN26230398 | ARUSH AASHISH NERALKAR |
| 38 | EN26233006 | AVANI AASHISH NERALKAR |
| 39 | EN26131565 | ANUSHKA ATUL KAWTIKWAR |
| 40 | EN26125431 | UTKARSH GOPAL SHINDE |
| 41 | EN26272955 | AYUSH ANIL LONKAR |
| 42 | EN26141876 | SHALEN RANJITKUMAR PATIL |
| 43 | EN26252202 | KANAK KAPIL JETHLIYA |
| 44 | EN26353954 | AVNI NEMA |
| 45 | EN26444039 | BIDYUT RANJAN DASH |
| 46 | EN26149814 | KRISHNACHANDRA RAKESH PANDIT |
| 47 | EN26111921 | NEEL AMITABH BOOB |
| 48 | EN26133991 | ADITYA SUMIT BAFNA |
| 49 | EN26315593 | ADSUL TEJAS VISHAL |

हर्षवर्धन सपकाळ यांनीही सीईटी परिक्षेबाबत खोटे आरोप केले.

आंदोलकांच्या मनात संताप निर्माण व्हावा हाच उद्देश ही बातमी पसरवण्यामागे होता. सरन्यायाधीशांना स्वत: खुलासा करून ही बातमी खोटी असल्याचे सांगावे लागले. आपल्या समोर अशी कोणतीच याचिका त्यावेळी सुनावणीसाठी आली नव्हती, त्यामुळे आपण असे बोलण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असा खुलासा दस्तुरखुद्द सरन्यायाधीशांना करावा लागला. अनेक वृत्तपत्रात, दूरचित्रवाणी वाहिन्यांवरही कोणतीच खातरजमा न करता सरन्यायाधीशांविरोधातील ही खोटी बातमी प्रसिद्ध केली आणि दाखवली गेली.

आंदोलन संपल्यानंतर महाराष्ट्रातील रोहित पवार नामक तथाकथित युवा नेत्याला खोट्या बातम्या पसरवण्याच्या स्पर्धेत भाग घेण्याची खुमखुमी आली. राज्य लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदासाठीच्या परिक्षेची प्रश्नपत्रिका १२ लाखांना विकली गेल्याचा आरोप रोहित पवारांनी केला. दिल्लीतील आंदोलनाच्या गरम तव्यावर आपली पोळी सहज भाजून निघेल, या अंदाजाने रोहित पवारांनी एमपीएससी परिक्षेबाबत धादांत खोटे आरोप केले. सरकार आणि सत्ताधारी पक्षाविरोधात भूमिका घेणे हे विरोधी पक्षांचे कर्तव्यच असते. मात्र हे कर्तव्य बजावत असताना आपण खोट्याचा बाजार मांडत आहोत, याचीही पर्वा रोहित पवारांसारख्या नेत्यांना करावीशी वाटत नाही. आपल्या आरोपांमुळे या परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये किती गोंधळ उडेल, मोठा संभ्रम निर्माण होईल याची रोहित पवारांसारख्या लोकप्रतिनिधीला माहिती नसेल असे म्हणता येणार नाही. सातत्याने प्रसिद्धीत राहण्याचा रोहित पवारांना छंद लागला आहे. त्यामुळेच सरकारविरोधात खोटे बोलण्याच्या स्पर्धेत रोहित पवारांनी पहिला क्रमांक मिळवला आहे. मुंबईतील आंदोलनात एका पोलीस अधिकाऱ्याने आंदोलक विद्यार्थिनीचा विनयभंग केल्याचा आरोपही याच रोहित पवारांनी केला होता. या घटनेचे छायाचित्र आणि व्हिडिओ चित्रीकरण उपलब्ध झाल्यानंतर रोहित पवार किती सराईतपणे खोटे बोलत होते, हे सिद्ध झाले. मुंबई पोलिसांनी तातडीने या घटनेबाबतचा खुलासा केला होता. सत्ता नसल्यामुळे रोहित पवारसारखी मंडळी वेडीपिशी झाली आहेत. त्यामुळे एकामागोमाग एक बेछूट आरोप करण्याचा सपाटा रोहित पवार, हर्षवर्धन सपकाळ आदी मंडळींनी लावला आहे. बेफाम पद्धतीने खोट्या बातम्या पसरवून आपण सरकारविरोधात हिंसक आंदोलन उभे करू शकतो, या समजापोटी ही विरोधक मंडळी उठता–बसता खोट्या आरोपांची राळ उडवत आहेत. यातून ही मंडळी आपलीच विश्वासार्हता संपून टाकत आहेत. एकही आरोप सिद्ध होत नसल्याने जनमानसात या कथित विरोधी नेत्यांचा पर्दाफाश सातत्याने होत आहे.

काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हे सेवादलाच्या पार्श्वभूमीचे आहेत, असे सांगितले जाते. या सपकाळ यांनी गेल्या काही दिवसात आपण आक्रमक नेते आहोत, हे दाखवण्यासाठी राहुल गांधी आणि रोहित पवारांची कास धरली आहे. सीईटी परिक्षेत भाजपा नेत्यांच्या मुलांचे मार्क

वाढले, असा आरोप करत सपकाळ यांनी सीईटीच्या प्रश्नपत्रिकाही फुटल्या होत्या, असे पत्रकार परिषदेत घेऊन सांगितले. नांदेडचे भाजपा नगरसेवक आशिष नेरळकर यांच्या दोन मुलांना १२वीच्या परिक्षेत ६२% आणि ६५% गुण मिळाले असताना त्यांना सीईटी परिक्षेमध्ये ९९% गुण कसे मिळाले, असा प्रश्न करत सपकाळ यांनी या परिक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप केला. हा आरोप करताना काँग्रेस प्रदेश अध्यक्ष भूषवणाऱ्या सपकाळ यांना पर्सेंट आणि पर्सेंटाईल या संकल्पनांमधला फरकही माहीत नव्हता. या आरोपांबद्दल सपकाळ यांच्या विरोधात तक्रारही दाखल झाली आहे. भारतीय जनता पार्टीला बदनाम करण्यासाठी विरोधी पक्षाची नेतेमंडळी धडधडीत खोटे बोलताना कोणत्या थराला जाऊ शकतात याची रोहित पवार, सपकाळ ही मोठी उदाहरणे आहेत. आपण खोटे बोलून एखाद्या घराण्याला, विद्यार्थ्यांना बदनाम करत आहोत, याचीही पर्वा रोहित पवारांना, हर्षवर्धन सपकाळ यांना करावीशी वाटत नाही. याच रोहित पवारांनी आपल्या काकूवरही म्हणजे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यावरही असभ्य भाषेत टीका केली होती. राजकारणात मोठे होण्यासाठी प्रसिद्ध मिळवण्याचा अत्यंत स्वस्त आणि सवंग मार्ग या मंडळींनी खोटेपणातून निवडला आहे. मात्र खोट्याचं आयुष्य अल्पकाळ असते याचा विसर या मंडळींना पडला आहे. खोटारड्यांचे सरकार



रोहित पवारांनी एका पोलीस अधिकाऱ्यावर बेछुट आरोप करून पोलीस दलाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला.




रोहित पवार यांनी वेगवेगळ्या मुद्यांवरून धडधडीत खोटी माहिती प्रसारीत करण्याचा कारखाना सुरु केला आहे.

असलेले राहुल गांधी यांनी संसदेमधील चर्चेत भाग घेताना आंदोलक विद्यार्थ्यांवर गोळीबार करण्याचे आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिल्याची लोणकढी ठोकून दिली. पोलिसांना आदेश मंत्री देत नसतात. जिल्हा पोलीस प्रमुख, पोलीस आयुक्त, महासंचालक या दर्जाचे अधिकारी परिस्थिती पाहून लाठीमार, अश्रूधुराच्या नळकांड्या फोडणे, गोळीबार करणे यासारखे आदेश देत असतात. काँग्रेस ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी राहुल गांधी यांच्या विधानाबद्दल अप्रत्यक्ष नापसंती व्यक्त केली आहे. 'संसदेत आरोप केले आहेत तर त्याची जबाबदारी राहुल गांधी यांनी घ्यावी', असे म्हणत चिदंबरम यांनी आपली नापसंती व्यक्त केली. यापूर्वी युवराज राहुल गांधींनी अशा खोट्या आरोपांबद्दल अनेकदा माफी मागितली आहे. राफेल विमान खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करत राहुल गांधींनी, 'चौकीदार चोर है', असे विधान केले होते. सर्वोच्च न्यायालयाने हे आरोप सिद्ध करण्यास सांगितल्यानंतर राहुल गांधींनी त्याबद्दल सपशेल माफी मागितली होती. खोटे-नाटे आरोप करून मोदी सरकार आणि भारतीय जनता पार्टीला बदनाम करून सत्ता मिळवता येईल, अशा समजुतीत हे नेते आहेत. मात्र मतदारांनी या मंडळींना अनेक निवडणुकांमध्ये नाकारले आहे, याचा विसर राहुल गांधी, संजय राऊत, रोहित पवार यांना पडला आहे. या पुढील काळातही मतदार अशा खोट्या प्रचाराला फसणार नाहीत, असा विश्वास आहे. ■

# भारताच्या बौद्ध वारशाचा जागतिक सन्मान

● ॲड. धर्मपाल मेश्राम

भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि मानवतेचा इतिहास सांगणाऱ्या पवित्र स्थळांमध्ये सारनाथ हे स्थान अत्यंत मानाचे आहे. तथागत भगवान गौतम बुद्धांनी बोधगया येथे ज्ञानप्राप्तीनंतर आपल्या जीवनातील पहिला धम्मोपदेश ज्या पवित्र भूमीवर दिला, ती भूमी म्हणजे सारनाथ. याच ठिकाणी भगवान बुद्धांनी आपल्या पहिल्या पाच शिष्यांना धम्मचक्र प्रवर्तन करून मानवजातीसाठी करुणा, अहिंसा, समता आणि मध्यम मार्गाचा संदेश दिला. त्यामुळे सारनाथ हे केवळ भारतातील नव्हे तर जगभरातील बौद्ध अनुयायांचे सर्वात पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते.

**दक्षिण** कोरियातील बुसान येथे झालेल्या युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीच्या ४८व्या अधिवेशनात सारनाथचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय केवळ एका ऐतिहासिक स्थळाला मिळालेला दर्जा नाही, तर भारताच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि बौद्ध वारशाला मिळालेली जागतिक मान्यता आहे. या ऐतिहासिक निर्णयामुळे भारतातील युनेस्को जागतिक वारसा स्थळांच्या यादीत आणखी एका अभिमानास्पद स्थळाची भर पडली आहे.



सारनाथचा जागतिक वारसा यादीत समावेश होणे ही भारतातील तसेच जगभरातील कोट्यवधी बौद्ध अनुयायांसाठी आनंदाची आणि अभिमानाची घटना आहे. बुद्धांच्या विचारांचा प्रभाव आशिया, युरोप, अमेरिका आणि जगातील अनेक देशांमध्ये आजही दिसून येतो. करुणा, अहिंसा आणि शांततेचा संदेश देणाऱ्या या महान परंपरेच्या मूळ स्थळाला जागतिक स्तरावर मान्यता मिळणे म्हणजे मानवतेच्या सार्वत्रिक मूल्यांचाही गौरव होय.

इतिहासाच्या दृष्टीने पाहिले तर सारनाथचा प्रवास अत्यंत समृद्ध आहे. सम्राट अशोकांनी येथे धर्मराजिका स्तूप, अशोक स्तंभ आणि अनेक बौद्ध स्मारकांची उभारणी केली. अशोक स्तंभावरील सिंहमुद्राच आज भारताचे राष्ट्रीय चिन्ह आहे. धमेख स्तूप, चौखंडी स्तूप, मूलगंध कुटी विहार, प्राचीन बौद्ध मठ आणि संग्रहालय यांमुळे सारनाथला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शतकानुशतके हे ठिकाण ज्ञान, साधना आणि अध्यात्माचे केंद्र राहिले आहे.

युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत एखाद्या स्थळाचा समावेश होण्यासाठी त्या स्थळाला असामान्य वैश्विक मूल्य (Outstanding Universal Value) असल्याचे सिद्ध करावे लागते. सारनाथने हा निकष यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. कारण हे केवळ धार्मिक स्थळ नाही, तर मानवाच्या वैचारिक उत्क्रांतीचा, शांततेच्या संदेशाचा आणि सांस्कृतिक इतिहासाचा जिवंत पुरावा आहे.

या मान्यतेमुळे सारनाथच्या संवर्धनाला नवे बळ मिळणार आहे. पुरातत्त्वीय अवशेषांचे संरक्षण, संशोधन, पर्यटकांसाठी सुविधा, आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा विकास आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना यासाठी या दर्जाचा मोठा लाभ होईल. जगभरातून अधिकाधिक पर्यटक, अभ्यासक आणि बौद्ध अनुयायी सारनाथला भेट देतील. त्यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती आणि पर्यटन उद्योगालाही मोठी चालना मिळेल.

उत्तर प्रदेशमध्ये यापूर्वी ताजमहल, आग्र्याचा किल्ला आणि फतेहपूर सिक्री या जागतिक वारसा स्थळांचाच समावेश होता. ताजमहालाची निर्मिती ही इ.स. १६३२ ते १६५३ करण्यात आलेली आहे व युनेस्को ने १९८३ ला जागतिक वारसा स्थळ यादीत मान्यता दिली. आग्र्याचा किल्ला हा इ. स. १५६५ ते १५७३ ह्या तर फतेहपुर सिक्री इसवी सन १५७१ ते १५७३ ह्या काळात बांधण्यात आले. आग्र्याच्या किल्ल्याला १९८३ तर फतेहपुर सिक्री ला १९८६ मध्ये जागतिक वारसा स्थळाच्या यादीत स्थान देण्यात आले. १९८३ ला इंदिरा गांधी तर १९८६ ला राजीव गांधी देशाचे प्रधानमंत्री होते. दुर्दैवाने बौद्ध वारसा स्थळे तत्कालीन वेळेला दुर्लक्षित राहिली, असेच ह्या ठिकाणी नमूद करावे लागेल. **या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आनंद व्यक्त करत, हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण असल्याचे म्हटले.** तसेच केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनीही या निर्णयाचे स्वागत करत, भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला मिळालेली ही जागतिक मान्यता असल्याचे नमूद केले. भारताच्या सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी आणि जागतिक स्तरावर त्याचा गौरव करण्यासाठी केंद्र सरकारने घेतलेल्या पुढाकाराचे हे फलित मानले जाते.

यាप्रसंगी एक गोष्ट विशेष अधोरेखित करणे आवश्यक आहे. सारनाथला मिळालेला हा सन्मान कोणत्याही एका धर्माचा विजय नाही. तो भारताच्या बहुविध सांस्कृतिक परंपरेचा, सहिष्णुतेचा आणि मानवतावादी विचारांचा गौरव आहे. भगवान बुद्धांचा संदेश संपूर्ण मानवजातीसाठी आहे. त्यांनी कोणत्याही एका समाजापुरता मर्यादित विचार मांडला नाही; तर करुणा, समता, अहिंसा आणि विवेक या वैश्विक मूल्यांचा मार्ग दाखवला. त्यामुळे सारनाथचा जागतिक वारसा यादीत समावेश हा संपूर्ण मानवतेच्या सांस्कृतिक वारशाचा सन्मान आहे. आज जग हिंसा, संघर्ष आणि असहिष्णुतेच्या अनेक आव्हानांना सामोरे जात आहे. अशा काळात भगवान बुद्धांचा मध्यम मार्ग, शांततेचा संदेश आणि मानवी मूल्यांचा आदर्श अधिकच महत्त्वाचा ठरतो. सारनाथला मिळालेली जागतिक मान्यता ही त्या विचारांची पुनर्स्थापना आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदीजींच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने पुढाकार घेत २०२४-२५ या कालावधीसाठी प्राचीन बौद्ध स्थळ - सारनाथ या नावाने युनेस्कोकडे प्रस्ताव सादर केला. त्यासाठी पुरातत्त्वीय, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक पुराव्यांची सविस्तर मांडणी करण्यात आली. या प्रक्रियेत केंद्रीय संस्कृती मंत्रालय, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) आणि संबंधित तज्ज्ञ संस्थांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.**

भारतीय म्हणून हा क्षण प्रत्येकासाठी अभिमानाचा आहे. आपल्या देशाच्या सांस्कृतिक संपदेचे, आध्यात्मिक वारशाचे आणि इतिहासाचे जगभरात होत असलेले कौतुक ही प्रत्येक नागरिकासाठी आनंदाची बाब आहे. सारनाथला मिळालेला हा सन्मान केवळ एका स्थळाचा नाही, तर भारताच्या हजारो वर्षांच्या संस्कृतीचा, बुद्धांच्या करुणामय तत्त्वज्ञानाचा आणि मानवतेच्या शाश्वत मूल्यांचा जागतिक गौरव आहे. सारनाथचा हा प्रवास भारताला जगाच्या सांस्कृतिक नकाशावर अधिक तेजस्वी बनवणारा आहे. हा अभिमान जपत या वारशाचे संवर्धन, संरक्षण आणि पुढील पिढ्यांपर्यंत त्याचे महत्त्व पोहोचवणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे हा ऐतिहासिक निर्णय भारताच्या सांस्कृतिक इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदला जाईल.

**(लेखक हे महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे माजी उपाध्यक्ष आहेत.)**

# आत्मनिर्भर भारताचा नवा चेहरा

> दिल्लीतील उपोषणाच्या निमित्ताने नरेंद्र मोदी यांच्या सरकारला कोंडीत पकडण्याची काही मंडळींची धडपड सुरु असताना संपूर्ण देशाला अभिमान वाटेल अशा घटना घडल्या आहेत. या घटना आत्मनिर्भर भारताचा चेहरा दर्शविणाऱ्या आहेत. पहिली घटना आहे ती भारतातील पहिली हायड्रोजन ट्रेन १७ जुलैपासून सुरु झाली. दुसरी घटना १८ जुलै रोजीची आहे. या दिवशी केंद्रातील मोदी सरकारच्या पाठिंब्यामुळे भारतीय तरुणांनी अवकाशात स्वतःचे रॉकेट प्रक्षेपित केले.




**देशातील** तरुणाई लोकप्रिय भाषेत जेन झी मोदी सरकारच्या विरोधात दिल्लीत रस्त्यावर उतरली, असे छात्या पिटून सांगितले जात असतानाच देशातील तरुणांनी आपण स्वतः बनवलेले रॉकेट अवकाशात पाठवले आहे. मोदी सरकारने सहा वर्षांपूर्वी म्हणजे २०२० मध्ये केलेल्या नव्या अवकाश धोरणाचा परिणाम म्हणूनच सरकारी संस्थांकडून झालेल्या थेट मदतीच्या माध्यमातून हे रॉकेट प्रक्षेपित झाले आहे. हैदराबाद येथील स्कायरूट एरोस्पेस या भारतीय खासगी अंतराळ कंपनीने विकसित केलेले विक्रम–१ या देशातील पहिले खाजगी ऑर्बिटल रॉकेटचे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून यशस्वीरित्या अवकाशात प्रक्षेपण झाले. भारतीय तरुणांनी स्वतः तयार केलेल्या नव्या रॉकेटच्या साह्याने देशी-विदेशी उपग्रह अवकाशात उड्डाण घेणार आहेत. संपूर्ण देशाला अभिमान वाटावा अशी ही घटना आहे. एकीकडे काही मंडळी मोदी सरकार विद्यार्थी, तरुण वर्गाच्या विरोधात आहे , तरुणाई कशी मोदी सरकारविरोधात संघटीत होत आहे असा कांगावा करीत असताना देशातील युवकांचे रॉकेट अवकाशात झेपावले. खाजगी क्षेत्राकडे कक्षेत उपग्रह प्रक्षेपित करण्याची क्षमता असलेला भारत हा जगातील तिसरा देश बनला आहे. लहान आकाराचे उपग्रह पृथ्वीच्या खालच्या कक्षेत यशस्वीपणे प्रस्थापित करण्यासाठी तयार केले गेले आहे. भारताच्या अंतराळ मोहिमेच्या क्षेत्रात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावा असा नवा अध्याय या निमित्ताने रचला गेला आहे. ही घटना संपूर्ण भारताच्या अंतराळ इतिहासासाठी अत्यंत मैलाचा दगड ठरली आहे. २०२० मध्ये मोदी सरकारने अंतराळ क्षेत्रात मोठे बदल केल्यामुळे खासगी कंपन्यांनाही रॉकेट तयार करणे, उपग्रह विकसित करण्याची परवानगी मिळालेली आहे. रॉकेट प्रक्षेपणातील यशामुळे मोदी सरकारच्या

'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला आणखी गती मिळणार आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील वाटचालीतील हा एक महत्त्वाचा आणि दिशादर्शक क्षण आहे. आपल्या खाजगी क्षेत्राचा वाढता सहभाग नवी दारे खुली करत असून नवोन्मेषाला गती देत आहे. कमी खर्चात उपग्रह प्रक्षेपित करण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने छोट्या उपग्रह कंपन्या, संशोधन संस्था आणि स्टार्टअप्सना त्याचा मोठा फायदा होणार आहे. अंतराळ तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, मटेरियल सायन्स तसेच सॉफ्टवेअर क्षेत्रात यापुढील काळात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. विक्रम-१ ही तर फक्त सुरुवात आहे आणि आपल्याला या क्षेत्रात अजून खूप पुढे जायचे आहे. आपल्या देशातील तरुणांमध्ये काहीतरी नवीन करण्याची जिद्द आहे, अशा सार्थ शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कामगिरीचे वर्णन केले आहे. हे यश असंख्य युवांना मोठी स्वप्ने पाहण्यासाठी आणि धाडसाने नवोन्मेषाची कास धरण्यासाठी प्रेरित करेल असेही पंतप्रधानांनी म्हटले आहे. चार टप्प्यांअंतर्गत मार्गाक्रमण करणारे हे रॉकेट अत्यंत वेगवान आणि मागणीनुसार प्रक्षेपण सेवा देण्याच्या उद्देशाने तयार केले गेले आहे. या मोहीमेच्या माध्यमातून देशातील युवा वर्गाचे कौशल्य, दृढनिश्चय आणि उद्योजकतेची भावना अधोरेखित झाली आहे. यासोबतच अंतराळ क्षेत्रातील आपण घडवून आणलेल्या सुधारणांमुळे नवोन्मेष आणि उद्योजकतेसंबंधीच्या नवीन संधी कशा रितीने निर्माण होऊ लागल्या आहेत हे सुद्धा या प्रक्षेपणातून दिसून येते.

**संपूर्ण देशासाठी गौरवाची आणखी एक घटना म्हणून कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या उद्दिष्टातून भारतीय रेल्वेने देशातील पहिली पूर्णतः स्वदेशी हायड्रोजन इंधन सेल ट्रेन सुरू केली आहे. १७ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या रेल्वेला हिरवा झेंडा दाखविला.** स्वच्छ, हरित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीच्या दिशेने हे एक मोठे यश आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ही रेल्वे गाडी केवळ भारताच्या तांत्रिक क्षमतेचे प्रतीक नव्हे; तर संपूर्ण जगासाठीही एक आदर्श आहे. हरयाणातील जिंद ते सोनीपत दरम्यान सुरू झालेली देशातील पहिली हायड्रोजन रेल्वे ही २१व्या शतकातील तंत्रज्ञानाच्या दिशेने भारताने टाकलेले एक मोठे पाऊल आहे. या रेल्वेच्या सामर्थ्याविषयी ऐकल्यावर प्रत्येक भारतीयाला नक्कीच



भारताच्या विकासातील महत्वाचा टप्पा ठरलेली हायड्रोजन रेल्वे.

अभिमान वाटेल. हायड्रोजन रेल्वे तंत्रज्ञान जगभरात केवळ ७-८ वर्षांपूर्वीच व्यावहारिकरित्या वापरात आले. जगात सध्या केवळ ३ देशांकडे अशा रेल्वे चालवण्याची क्षमता आहे. या रेल्वेची क्षमता तब्बल ३,२०० अश्वशक्ती असून त्यात दहा डबे आहेत.

इतर देशातील हायड्रोजन रेल्वेमध्ये साधारणपणे केवळ तीन ते चार डबे आहेत. या प्रगत प्रणालीची संपूर्ण रचना करणाऱ्या प्रतिभावान भारतीय अभियंत्यांना आणि या रेल्वेची निर्मिती निर्दोषपणे पूर्ण करणाऱ्या स्थानिक उत्पादन कंपन्यांना या यशाचे श्रेय आहे. हायड्रोजन रेल्वे हे 'मेक इन इंडिया' उपक्रमाचे एक अत्यंत यशस्वी आणि अभिमानास्पद उदाहरण ठरले आहे. हरयाणातील जिंद ते सोनीपत हा ८९ किलोमीटरचा रेल्वेमार्ग जगाच्या नकाशावर भारताची नवी ओळख करून देणार आहे. या हायड्रोजन रेल्वेमध्ये वापरल्या गेलेल्या तंत्रज्ञानामुळे डिझेलची गरज उरत नाही.

हायड्रोजन आणि ऑक्सिजनच्या प्रक्रियेतून केवळ पाण्याची वाफ बाहेर पडते, ज्यामुळे शून्य प्रदूषण होते. खेदाची गोष्ट म्हणजे दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी या रेल्वेवर दगडफेक करण्यात आली. आपण भारतीय पाश्चिमात्य देशांमध्ये गेल्यावर तेथील अत्याधुनिक परिवहन व्यवस्थेचे, अन्य सुविधांचे गोडवे गात असतो. मात्र तशाच पद्धतीच्या सुविधा भारतात मोदी सरकारच्या प्रयत्नांतून सुरु होत आहेत. मुंबई-पुण्यात उभारली गेलेली भूमिगत मेट्रो स्थानके ही प्रगत देशांच्या तोडीचीच आहेत. सतत आंदोलने करून, खोटी माहिती पसरवून एकीकडे देशात अराजक निर्माण करण्याचा प्रयत्न होत असताना दुसरीकडे सरकार प्रगती आणि विकासाची नवनवी पावले टाकत आहेत. ■

# पुण्यातील वाहतूक कोंडी सुटणार

## ’तीन उन्नत मार्गांचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत भूमीपूजन




**पुणे** शहर हे भविष्यातील अत्याधुनिक तंत्रज्ञान (डीप टेक) आणि जागतिक क्षमता केंद्रांचे (जीसीसी) प्रमुख केंद्र बनण्याच्या मार्गावर असून सन २०३० पर्यंत पुणे हे देशातील अत्यंत आधुनिक शहर व प्रमुख विकास केंद्र (ग्रोथ इंजिन) म्हणून नावारूपाला येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. शहराची वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी राज्य शासनाने पुणे–शिरूर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर आणि हडपसर–यवत या तीन महत्त्वपूर्ण उन्नत मार्ग प्रकल्पांना गती दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून ‘बांधा, वापरा व हस्तांतरित करा’ तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या नाविन्यपूर्ण प्रकल्पांतून शासनाला अनुक्रमे ५००, ३०० आणि १५० कोटी असा एकूण ९५० कोटी रुपयांचा आगाऊ निधी प्राप्त होणार आहे. या प्रकल्पांमुळे पुण्याची वाहतूक कोंडीची समस्या दूर होईल.

पुणे–शिरुर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर, हडपसर–यवत या ३ उन्नत मार्गांच्या प्रकल्पांच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, महापौर मंजुषा नागपुरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, पुणे–शिरूर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर व हडपसर–यवत या तीन महत्त्वपूर्ण प्रकल्पांमुळे पुण्यातील वाढत्या वाहतूक कोंडीवर व विशेषतः औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांवरील समस्येवर कायम स्वरूपी उपाय मिळणार आहे. या उन्नत मार्गांवरच भविष्यात मेट्रो मार्गिका उभारण्यासाठी आतापासूनच आवश्यक ती डिझाईन तयार केली आहे. यामुळे भविष्यात जेव्हा मेट्रोचे काम सुरू होईल, तेव्हा कोणताही अडथळा निर्माण होणार

## तिन्ही रस्ते प्रकल्पांची वैशिष्ट्ये

■ पुणे–शिरूर महामार्ग प्रकल्पांतर्गत राष्ट्रीय महामार्ग ७५३ एफ वरील सुमारे ५४ किलोमीटर मार्गाचा विकास करण्यात येणार आहे. *या प्रकल्पात पहिल्या ३१ किलोमीटरमध्ये सहा पदरी उन्नत महामार्ग, तर स्थानिक वाहतुकीसाठी समांतर चार पदरी रस्ता विकसित केला जाणार आहे.* भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही तरतूद करण्यात आली आहे. पुणे ते शिरूर प्रवासाचा कालावधी दोन तासांवरून ४५ ते ५० मिनिटांपर्यंत कमी होणार आहे.

■ हडपसर–यवत महामार्ग प्रकल्पाची एकूण लांबी सुमारे ३१.५ किलोमीटर असून, त्यात २५ किमी.चा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि सहा पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पात उरुळी कांचनपर्यंत भविष्यातील मेट्रो मार्गासाठीही स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे.

■ तळेगाव–चाकण–शिक्रापूर कॉरिडॉर हा सुमारे ५३ किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा प्रकल्प असून, *त्याअंतर्गत सुमारे २६ किलोमीटरचा उन्नत बहुस्तरीय महामार्ग आणि ५३.२ किलोमीटर लांबीचा चार पदरी भूपृष्ठावरील रस्ता विकसित करण्यात येणार आहे.* या प्रकल्पामुळे जलदगती वाहने आणि स्थानिक वाहतूक स्वतंत्र मार्गाने होणार असल्याने वाहतूक कोंडी कमी होईल. चाकण औद्योगिक परिसर, पुणे रिंगरोड आणि राष्ट्रीय महामार्गांना प्रभावी जोडणी मिळाल्याने औद्योगिक, व्यापारी आणि लॉजिस्टिक क्षेत्राला मोठी चालना मिळणार आहे.

नाही व या एकत्रित रचनेमुळे मेट्रोच्या खर्चात किमान ४० टक्क्यांची बचत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नव्या पुरंदर विमानतळाशी जोडणी (कनेक्टिव्हिटी) वाढविण्यावरही शासनाचा भर असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. दिवेघाटामध्ये दुहेरी बोगदा तयार करून त्यातून रस्ता व मेट्रो नेल्यास पुरंदर विमानतळावर पोहोचण्याचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल व विनाअडथळा प्रवास शक्य होईल, यादृष्टीने विचार सुरु आहे. या विमानतळासाठी ५० टक्क्यांहून अधिक भूसंपादन पूर्ण झाले असून, देशाच्या इतिहासात इतक्या वेगाने भूसंपादन होण्याचा हा विक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच १७३ किलोमीटरचा बाह्य व ८६ किलोमीटरचा अंतर्गत वर्तुळाकार रस्ता (रिंग रोड) दोन वर्षांत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून यामुळे शहरातील वाहतूक कोंडी ३० टक्क्यांनी कमी होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**पुलांची सुरक्षितता आणि गुणवत्ता अबाधित राहण्यासाठी रबरी बेअरिंग्ज व एक्स्पान्शन जॉइंट्सच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करू नका, अशा स्पष्ट सूचना श्री. गडकरी यांनी संबंधित अधिकारी आणि कंत्राटदारांना दिल्या.**

### वाहतूक प्रश्न सुटणार: केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी म्हणाले, पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी आणि प्रदूषणाची गंभीर समस्या दूर करण्यासाठी पुणे–शिरूर, तळेगाव–चाकण–शिक्रापूर आणि हडपसर–यवत हे तीन उन्नत मार्गांचे प्रकल्प अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. या तिन्ही प्रकल्पांच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात होत असून, त्यामुळे पुण्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सुरळीत होऊन नागरिकांना मोठा दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या प्रकल्पांच्या उभारणीसाठी राज्य शासनाने दिलेल्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल गडकरी यांनी समाधान व्यक्त केले. या प्रकल्पांमध्ये वापरण्यात येणाऱ्या पोलाद आणि सिमेंटवरील राज्य शासनाच्या हिश्श्याचा वस्तू व सेवा कर माफ करण्यात आला आहे. तसेच, वाळू, खडी आणि अन्य बांधकाम साहित्यावरील स्वामित्व धन माफ करण्याबरोबरच भूसंपादन प्रक्रियेलाही शासनाने मोठे सहकार्य केले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक प्रतिसादामुळेच या प्रकल्पांना अपेक्षित गती मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

रस्ते आणि पुलांच्या बांधकामात जागतिक दर्जाच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर दिला जात असल्याचे श्री.गडकरी यांनी सांगितले. मलेशियामध्ये विकसित करण्यात आलेल्या 'अल्ट्रा हाय परफॉर्मन्स फायबर रिइन्फोर्समेंट काँक्रिट' या तंत्रज्ञानामुळे पुलांतील दोन खांबांमधील अंतर ३० मीटरवरून १२० मीटरपर्यंत वाढविणे शक्य झाले आहे. त्यामुळे खर्चात बचत होण्याबरोबरच एकाच खांबावर रस्ता, पूल आणि मेट्रो अशी अत्याधुनिक रचना उभारता येणार आहे. ■

# राज्यातील ८४१ अॅट्रॉसिटी पीडितांच्या वारसांना शासकीय नोकरी

**अनुसूचित** जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमांतर्गत मृत्यू झालेल्या पीडितांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती-जमाती आयोगाने गेल्या काही वर्षांत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला ऐतिहासिक यश मिळाले आहे. आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य अॅड. धर्मपाल मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सलग बैठका, विविध विभागांशी समन्वय, शासनाकडे सातत्याने केलेला पाठपुरावा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखविलेल्या संवेदनशील भूमिकेमुळे राज्यातील ८४१ अॅट्रॉसिटी पीडितांच्या मृत वारसदारांना शासकीय नोकरी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रत्यक्षात आला आहे.

आयोगाच्या नोंदींनुसार, अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खून व मृत्यूच्या प्रकरणांमध्ये पीडित कुटुंबातील पात्र वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची तरतूद प्रभावीपणे राबविण्यासाठी आयोगाने विशेष मोहीम हाती घेतली होती. राज्यातील विविध विभागांचे सचिव, समाजकल्याण आयुक्तालय, सामान्य प्रशासन विभाग, प्रादेशिक उपआयुक्त, जिल्हाधिकारी तसेच संबंधित अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेऊन प्रलंबित प्रकरणांचा तपशीलवार आढावा घेण्यात आला. या बैठकीत सुरुवातीला राज्यातील ४८४ प्रकरणे प्रलंबित असल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. अनेक जिल्ह्यांमध्ये पात्र लाभार्थ्यांना नोकरी देण्याबाबत कोणतीही एकसमान कार्यपद्धती नव्हती. काही जिल्ह्यांमध्ये लाभ देण्यात आला होता, तर अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित होती. आयोगाने याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत सर्व जिल्ह्यांकडून माहिती मागविली आणि एकसमान धोरण तयार करण्याचे निर्देश दिले. यानंतर आयोगाच्या पुढाकारातून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सामान्य प्रशासन विभाग आणि समाजकल्याण आयुक्तालय यांच्या संयुक्त बैठका घेण्यात आल्या. अॅड. धर्मपाल मेश्राम यांनी प्रत्येक प्रकरणाचा स्वतंत्र आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. अत्याचारग्रस्त कुटुंबांना न्याय मिळण्यात होणारा विलंब हा अन्याय असल्याचे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. बैठकांमध्ये शासनाकडून स्पष्ट करण्यात आले की, अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत खून अथवा मृत्यू झालेल्या प्रकरणांमध्ये पात्र वारसांना शासकीय नोकरी देण्याबाबत शासन सकारात्मक असून आवश्यक कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. आयोगाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर शासनाने जिल्हानिहाय माहिती संकलित करून पात्र लाभार्थ्यांची यादी निश्चित केली.

या संपूर्ण प्रक्रियेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष संवेदनशीलतेने हाताळले. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत महत्त्वाचा असल्याची भूमिका त्यांनी घेतली आणि संबंधित विभागांना तातडीने निर्णय प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री कार्यालयाच्या समन्वयामुळे विविध प्रशासकीय अडथळे दूर झाले आणि दीर्घकाळ प्रलंबित असलेली प्रकरणे मार्गी लागली.

या प्रयत्नांचे फलित म्हणून महाराष्ट्रातील ८४१ अत्याचारग्रस्त कुटुंबांतील पात्र वारसदारांना शासकीय नोकरी उपलब्ध करून देण्यात आली. या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाला असून सामाजिक पुनर्वसनाची प्रक्रिया अधिक प्रभावी झाली आहे. शासनाच्या या निर्णयामुळे केवळ रोजगार उपलब्ध झाला नसून संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाही बळ मिळाले आहे. उपाध्यक्ष अॅड. धर्मपाल मेश्राम यांनी या निर्णयाचे स्वागत करत सांगितले की, आयोगाचा उद्देश केवळ तक्रारींची सुनावणी करणे नसून पीडितांना प्रत्यक्ष न्याय मिळवून देणे हा आहे. अत्याचारामुळे कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबांना आर्थिक व सामाजिक आधार मिळणे ही शासनाची घटनात्मक जबाबदारी आहे. आयोगाने त्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आणि राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ह्या सर्व पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला. ■

# नागपूरमधील 20 जणांना आयर्निंग टेबलचे वाटप




**अनुवंशिक** परंपरेने धोबी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीला स्वबळावर उभे राहण्यासाठी बदलत्या यांत्रिकी युगामध्ये आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर करून उत्पादन व नफा वाढवण्यासाठी देवाभाऊ रजक योजनेमार्फत उद्योग आघाडीच्या वतीने वाटप करण्यात आलेल्या स्टीम आयर्निंग टेबलमुळे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या अंत्योदयापर्यंत विकास पोहोचविला असेच समजले जाईल. असे उद्गार महसूल मंत्री व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या कार्यक्रमाच्या वेळेस विचार मांडले. भाजपा उद्योग आघाडी प्रदेश अध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांच्या संकल्पनेतून धोबी व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी 'देवाभाऊ रजक योजने'चा प्रारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनानिमित्त त्यांच्या नागपूर येथील दक्षिण पश्चिम मतदारसंघात २० धोबी लोकांना या टेबलाचे वितरण करण्यात आले आहे.

या कार्यक्रमला भाजपा प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांनीही भेट दिली. भाजपा उद्योग आघाडीच्या या कार्यक्रमास प्रदेश उपाध्यक्ष उपेंद्र कोठेकर, आमदार परिणय फुके, नागपूर शहराध्यक्ष दयानंद तिवारी, सुनील मित्रा, मंडळाचे अध्यक्ष नगरसेवक उपस्थित होते.

उद्योग आघाडी प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर यांनी लाभार्थ्यांना नक्षत्र संपर्क कार्यालयात सात दिवस प्रशिक्षण देऊन नागपूर जिल्ह्यामध्ये २०० लघुउद्योग उभे करण्याचा मानस यावेळेस जाहीर केला. नाविन्यपूर्ण शासकीय योजनेमध्ये धोबी समाजातील लोकांना अशा पद्धतीचे



आयर्निंग टेबल देता येतात का याबाबत गांभीर्याने विचार करू, असे आश्वासन यावेळेस उपस्थित असलेले पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

देवेंद्र फडणवीस यांनी समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून त्यांना सक्षम करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केले त्याचाच हा भाग असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उद्योग आघाडीचे सहसंयोजक विश्वजीत देशपांडे- पुणे, हरीश भाटिया- उल्हासनगर, डॉ. माधवी देशमुख- पनवेल, अभिषेक गजन, पंकज सिंग- मुंबई, सुधीर नाईक, इंद्रजीत राव, विक्रम देशपांडे रामप्रसाद दांड- संभाजीनगर, संजय कावडे, सतीश सोमानी- हिंगोली, समीर बाकरे, सुधीर घोडेस्वार, महिपाल सिटी- नागपूर, भगवान पाडळे, अनिल यशवंते, राजेंद्र तापडिया, जालना आधी पदाधिकाऱ्यांनी तीन दिवस नागपूरमध्ये थांबून प्रचंड मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यात योगदान लावले. ■

# संत रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त कलश यात्रा








संत शिरोमणी श्री गुरु रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त कलश यात्रा– उपस्थिती– मुंबई अध्यक्ष आ.अमित साटम, सरचिटणीस आचार्य पवन त्रिपाठी, विनोद शेलार, राजेश शिरवडकर, श्वेता परुळकर, महिला मोर्चा अध्यक्षा योजना ठोकळे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष शरद कांबळे, संतोष मेढेकर आदी.



कांदिवली (मुंबई) येथे कलश पूजन– उपस्थिती– आ. अतुल भातखळकर, नगरसेविका नीलम गुरव, सुधीर शिंदे, रविकांत विश्वकर्मा आदी.

# देवाभाऊंच्या वाढदिवसानिमित्त झाला 'पैलवान दत्तक योजने'चा प्रारंभ



**महाराष्ट्राच्या** मातीने देशाला असंख्य मल्ल दिले; मात्र गरिबीमुळे अनेक गुणी पैलवानांची स्वप्ने आखाड्याबाहेरच थांबली. ही परंपरा मोडून काढण्याचा निर्धार करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त युनायटेड रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि देवाभाऊ केसरी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'पैलवान दत्तक योजना २०२६-२७' या उपक्रमाचा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमांतर्गत महाराष्ट्रातील ११ होतकरू पैलवानांना दत्तक घेत त्यांना शिष्यवृत्ती, मानधन आणि क्रीडा साहित्याचे वितरण करण्यात आले.

**या योजनेत सोहम कुंभार, ज्ञानवी पाटील, संग्राम खुर्द, रणवीर जाधव, श्रीकर नायकवडी, वैष्णवी पाटील, वीरेन पाटील, हर्षल घाटके, विश्वजीत सावंत, पियुष शेवाळे आणि व्यंकटेश चोरगे या ११ होतकरू पैलवानांची निवड करण्यात आली.** आर्थिक आधारासह दर्जेदार प्रशिक्षणासाठी हा उपक्रम त्यांच्या कारकिर्दीतील महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. युनायटेड रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष काझी अब्दुल मतीन यांनी सांगितले की, या योजनेत निवड झालेली बहुतांश मुले शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबातील आहेत. आर्थिक अडचणींमुळे कोणत्याही गुणवंत खेळाडूची स्वप्ने अपूर्ण राहू नयेत, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे. नव्या पिढीतील होतकरू पैलवान घडविणे हे आमसच्या फेडरेशनचे ध्येय असून ही योजना संपूर्ण महाराष्ट्रात विस्तारण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.

देवाभाऊ केसरी फाउंडेशनचे अध्यक्ष रोहित पटेल म्हणाले की, ही फक्त शिष्यवृत्ती योजना नाही. ग्रामीण भागातील कुस्ती संस्कृतीला नवसंजीवनी देणारा हा उपक्रम आहे. भविष्यात या योजनेचा विस्तार अधिक व्यापक स्वरूपात केला जाईल.

युनायटेड रेसलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे सचिव दत्तात्रय जाधव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या काळात तसेच त्यानंतर अनेक साखर कारखान्यांनी पैलवानांना दत्तक घेऊन त्यांना आर्थिक आधार दिला. त्याच प्रेरणेतून आधुनिक काळात ही संकल्पना नव्याने सुरू करण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सोहळ्याला ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव (पोलीस उपायुक्त, मुंबई), ट्रिपल महाराष्ट्र केसरी विजय चौधरी (सहाय्यक पोलीस आयुक्त, नवी मुंबई) तसेच डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांच्यासह कुस्ती क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. ■



पालघर येथील उबाठाचे माजी नगरसेवक प्रथमेश पिंपळे यांच्यासह वेगवेगळ्या संघटनांचे पदाधिकारी भाजपात- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, आ. हरिश्चंद्र भोये, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, वसई-विरारचे नगरसेवक अशोक शेळके, ॲड. रवींद्र गडग, हेमांगी भगत, सचिन राऊत, सतीश शिंदे, विशाल पवार, रविंद्र पिंपळे, पुष्पक पाटील, केतन मोरे आदी.



भारतीय कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह शेकडो कामगार कार्यकर्ते भाजपात- उपस्थिती- प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, प्रदेश सरचिटणीस आ. योगेश सागर, अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे सरचिटणीस सुहास माटे, प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन, श्रीकांत घाग, दीपक वाघ, दान बहाद्दूर यादव, साई प्रसाद मोरजकर, नवनाथ जाधव, गिलबर्ट जोसेफ, सुरेश पाटील आदी.






प्रदेश युवा मोर्चा संवाद बैठक- उपस्थिती- प्रदेश सरचिटणीस व युवा मोर्चा प्रभारी सुनील राणे, युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष कृष्णराज महाडिक, युवा मोर्चा माजी प्रदेश अध्यक्ष राहुल लोणीकर.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




प्रति,

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com